- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,२८,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,११,३५० /-
✔ चांदी : १,५८,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर
संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 Mail Id : sinhvanivrutta@gmail.com दिनांक : रविवार, २९ नोव्हेंबर २०२६ Epaper : epaper.sinhvani.com पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३४९ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

देवस्थानच्या जमिनींचे संरक्षण करण्यासाठी स्वतंत्र कायदेशीर तरतूद करणार

कायदा सभागृहात आणणार, आदिवासी शेतकऱ्यांना वनपट्ट्यांसह जमिनीची मालकी देण्यासाठी विशेष मोहीम, मौदा एनटीपीसी प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न केंद्राकडे मांडणार, काँग्रेसचे अनेक खासदार डिलिमिटेशनला समर्थन देतील : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

देवस्थानच्या जमिनींचे संरक्षण व्हावे आणि या जमिनींवर कोणालाही बेकायदेशीरपणे कब्जा करता येऊ नये, यासाठी राज्य सरकार देवस्थान इनाम जमीन कायद्याबाबत काम करत आहे. यासाठी समिती स्थापन करण्यात आली असून, देवस्थानांचे प्रमुख पदाधिकारीही या समितीत सहभागी आहेत. देवस्थानांच्या जमिनींचे हक्क अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक कायदेशीर अधिकार देणारी कायदेशीर तरतूद सभागृहात आणण्यात येईल, अशी माहिती महसूलमंत्री तथा नागपूर व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपुरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.

आदिवासी शेतकऱ्यांना जमिनीची मालकी देण्यासाठी मोहीम

आदिवासी जमिनींच्या प्रश्नावर बोलताना बावनकुळे म्हणाले, आदिवासी समाजाला वनहक्क पट्टे देण्याची प्रक्रिया सुरू आहे. सातबारा आणि इतर महसुली नोंदींमधील आवश्यक दुरुस्त्यांमुळे आदिवासी शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचे पूर्ण हक्क मिळण्यास मदत होणार आहे. ज्या पात्र आदिवासी शेतकऱ्यांना अद्याप वनहक्क पट्टे किंवा जमिनीचे मालकी हक्क मिळालेले नाहीत, त्यांना या विशेष मोहिमेच्या माध्यमातून जमिनीची मालकी मिळवून देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

मौदा एनटीपीसी प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न केंद्राकडे मांडणार

मौदा येथील एनटीपीसी प्रकल्पामुळे बाधित झालेल्या नागरिकांच्या प्रश्नावर बावनकुळे म्हणाले, केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर यांची वापूर्ली दोन वेळा भेट घेतली आहे. एनटीपीसी प्रकल्पासाठी ज्यांच्या जमिनी गेल्या, त्यांना नोकरी मिळावी, तसेच राखेमुळे गंभीर अडचणींचा सामना करणाऱ्या कुंभारी गावाचे योग्य पुनर्वसन व्हावे, अशी आमची मागणी आहे.

राखेमुळे गावातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असून, अनेकांना किडनी, लिव्हर आणि हृदयाशी संबंधित आजारांचा सामना करावा लागत असल्याच्या तक्रारी आहेत. या प्रश्नावर पुन्हा केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर यांची भेट घेणार असून, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनाही विनंती करून हा विषय केंद्र सरकारसमोर मांडणार आहे.

डिलिमिटेशनमुळे लोकशाही अधिक सक्षम होईल; महिलांना ३३ टक्के आरक्षणाचा लाभ

डिलिमिटेशनच्या मुद्द्यावर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केलेल्या आरोपांना उत्तर देताना बावनकुळे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भारताला जगातील सर्वोत्तम आणि विकसित देश बनविण्याच्या भूमिकेतून काम करत आहेत. काँग्रेसच्या पायाखालची जमीन सरकल्यामुळे जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

डिलिमिटेशनमुळे खासदार आणि आमदारांची संख्या वाढणार असून, संविधानाने दिलेल्या अधिकारांच्या चौकटीतच ही प्रक्रिया होत आहे. लोकप्रतिनिधी आणि मतदार यांच्यातील अंतर कमी होईल. प्रत्येक मतदारसंघातील नागरिकांना अधिक प्रभावीपणे सेवा देता येईल. सरकार अधिक पारदर्शक आणि लोकाभिमुख होण्यासही याचा फायदा होईल.



या ऐतिहासिक प्रस्तावाला शरद पवार गटाकडून समर्थन मिळणार असल्याचे संकेत आहेत. या विधेयकामुळे जनतेचे हित साधले जाणार असून, महिलांना ३३ टक्के आरक्षणाचा लाभ मिळेल. खऱ्या अर्थाने महिलांना सत्तेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

काँग्रेसचा अजेंडा केवळ मोदींना विरोध करण्याचा

शरद पवार गट इंडिया आघाडीच्या बैठकीत सहभागी झाला नसल्याच्या पार्श्वभूमीवर बावनकुळे म्हणाले, काँग्रेसचा एकमेव अजेंडा म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विरोध करणे. डिलिमिटेशनचा फायदा काँग्रेसच्या प्रत्येक खासदाराला माहीत आहे. मात्र, पक्षाच्या भवितव्यावर परिणाम होण्याची भीती संघटनांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, कर्मचाऱ्यांच्या आर्थिक मागण्यांचाही या आंदोलनात महत्त्वाचा मुद्दा असणार आहे. २०१६ पासूनची वेतन थकबाकी आणि २०१८ पासूनचा प्रलंबित महागाई भत्ता तातडीने देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. अनेक वर्षांपासून थकलेली आर्थिक देणी मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे. यापूर्वीही दिवाळीच्या पार्श्वभूमीवर एसटी कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. मात्र, आता पुन्हा एकदा संयुक्त कृति समितीने आंदोलनाची हाक दिल्याने एसटी महामंडळातील कामगार प्रश्न चर्चेत आले आहेत.

थोडक्यात

बटाट्याचे दर घसरले

आंबेगाव: सध्या बटाट्याचे बाजारभाव मोठ्या प्रमाणात घसरल्याने उत्पादनासाठी केलेला खर्चही वसूल होत नसल्याची शेतकऱ्यांची व्यथा आहे. कांदा वगळता इतर बहुतांश शेतमालाला समाधानकारक दर मिळत नसल्याने शेती करणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. बटाटा पिकासाठी बियाणे, खते, औषधे, मजुरी, पाणी आणि मशागतीवर मोठा खर्च करावा लागतो. मात्र, बाजारात बटाट्याला मिळणारा दर उत्पादनखर्चाच्या तुलनेत कमी असल्याने शेतक-यांच्या हातात नफा तर दूरच; पण गुंतवलेले भांडवलही परत मिळत नसल्याची परिस्थिती आहे. त्यामुळे कष्टाने पिकवलेला शेतमाल बाजारात नेल्यानंतर शेतकऱ्यांच्या पदरी निराशा पडत आहे. दरवर्षी वाढणारा उत्पादनखर्च, मजुरीचे वाढलेले दर, महागडी खते, बियाणे आणि औषधांच्या किमतीमुळे शेतीचे अर्थकारण दिवसेंदिवस बिघडत आहे. त्यातच बाजारभावातील अनिश्चितता शेतक-यांसाठी डोकेदुखी ठरत आहे. कांद्याला काही प्रमाणात चांगला बाजारभाव मिळत असला, तरी इतर शेतीमालाला अपेक्षित दर मिळत नसल्याचे शेतकरी सांगत आहेत.

गौतम अदानी यांनी घेतली शरद पवारांची भेट

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यावर मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरू असताना उद्योगपती गौतम अदानी यांनी शनिवारी (२८ नोव्हेंबर) त्यांची भेट घेतली. सकाळी अचानक रुग्णालयात दाखल झालेल्या अदानी यांनी पवार यांच्यासोबत तब्बल अडीच तास चर्चा केली. या भेटीमुळे राज्यातील राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले.

अॅग्रोव्हिजनमुळे शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन

अॅग्रोव्हिजनबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले, देशातील सर्वात मोठ्या कृषी प्रदर्शनांपैकी एक असलेले अॅग्रोव्हिजन हे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकार झाले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून लाखो शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडत आहे. आधुनिक शेती, नवीन तंत्रज्ञान, कृषी संशोधन आणि शेतकऱ्यांना मिळणारे मार्गदर्शन यामुळे अॅग्रोव्हिजन शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरले आहे.

खासदारांनी या प्रस्तावाला समर्थन दिले, हे स्पष्ट होईल. काँग्रेसमधील अनेक खासदार या विधेयकाला मदत करतील, असा विश्वासही बावनकुळे यांनी व्यक्त केला.

शरद पवारांना काँग्रेसनेच राजकीयदृष्ट्या लक्ष्य केले

शरद पवार यांच्या भूमिकेवर काँग्रेसकडून होत असलेल्या टीकेला उत्तर देताना बावनकुळे म्हणाले, जेव्हा काँग्रेसला सत्तेत येण्यासाठी शरद पवार यांची मदत आवश्यक होती, तेव्हा ते काँग्रेसला चांगले वाटत होते. मात्र, आता ऐतिहासिक विधेयकाला त्यांनी समर्थनाची भूमिका घेतली, तर ते काँग्रेसला वाईट वाटू लागले आहेत.

काँग्रेस एकटी पडली असून, त्यांची राजकीय स्वप्ने भंगली आहेत. राहुल गांधी यांना पंतप्रधान करण्याचे स्वप्न आणि काँग्रेसमधील काही नेत्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षांना धक्का बसल्यामुळेच शरद पवार यांच्यावर अशा प्रकारची टीका केली जात आहे, असे ते म्हणाले.

सुशीलकुमार शिंदेसारखे ज्येष्ठ नेते विधेयकाचे महत्त्व ओळखतात

डिलिमिटेशनच्या प्रस्तावाला काँग्रेसमधील काही नेत्यांचा विरोध असला, तरी सुशीलकुमार शिंदे यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांना या विधेयकाचे महत्त्व माहीत आहे. त्यामुळे ते या प्रस्तावाचे समर्थन करतील. काँग्रेसमध्ये काही नेते पक्षाच्या भूमिकेला विरोध करू शकत नसले, तरी या विधेयकाचे महत्त्व समजणारे अनेक नेते त्याच्या बाजूने आहेत, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

एसटी कर्मचाऱ्यांचा पुन्हा एल्गार; राज्यभर आंदोलनाचा इशारा

वृत्तसंस्था, मुंबई

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अर्थात एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेतला आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या संयुक्त कृति समितीने राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा करत शासन आणि प्रशासनाला इशारा दिला आहे.

येत्या १० डिसेंबर रोजी राज्यातील सर्व विभागीय कार्यालयांसमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असून, त्यानंतर हिवाळी अधिवेशनावर धडक देण्याची भूमिका कर्मचाऱ्यांनी घेतली आहे.एसटी कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या गेल्या कित्येक वर्षांपासून प्रलंबित आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही या प्रश्नांवर ठोस निर्णय होत नसल्याने कामगार संघटनांमध्ये नाराजी वाढली आहे. त्यामुळे आता आंदोलनाच्या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधण्याचा निर्णय संयुक्त कृति समितीने घेतला आहे.

या आंदोलनात एसटी महामंडळाच्या धोरणांनाही विरोध करण्यात येणार आहे. महामंडळासाठी ई-बसेस



भाडेतत्त्वावर घेण्याच्या निर्णयावर कर्मचाऱ्यांनी आक्षेप घेतला आहे. तसेच एसटी महामंडळाच्या मालकीच्या जमिनी खासगी तत्त्वावर देण्याच्या धोरणालाही संघटनांचा विरोध आहे. महामंडळातील वाढते कंत्राटीकरण थांबवावे, अशी मागणीही कामगारांकडून करण्यात येत आहे. या निर्णयांमुळे महामंडळाच्या

तुमच्या राष्ट्रवादीवर जनता विश्वास ठेवणार नाही; राऊतांनी पवारांना सुनावले





वृत्तसंस्था, नवी दिल्ली

शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने डिलिमिटेशन विधेयकाला पाठिंबा जाहीर केल्यापासून महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीमध्ये प्रचंड संतापाची लाट उसळली आहे. आमदार जितेंद्र आव्हाड यांनी त्यांच्या पक्षाने विधेयकाला पाठिंबा देत असल्याचा निर्णय शुक्रवारी (२७ नोव्हेंबर) जाहीर केल्यानंतर इंडिया आघाडीत फूट पडल्याची चर्चा आहे. यावरून काँग्रेसच्या विजय वडेट्टीवारांनी कठोर टीका केल्यानंतर ठाकरे गटाच्या संजय राऊतांनीही पवारांच्या पक्षावर टिकेचे आसूड ओढले आहेत. शरद पवारांना महाविकास आघाडीने राज्यसभेत पाठवले.

आता त्यांनी मोदी-शहांना पाठिंबा दिला असेल तर पवारांच्या राष्ट्रवादीवर भविष्यात महाराष्ट्रातील जनता विश्वास ठेवणार नाही. एवढेच नाही तर त्यांनी मोदी-शहांच्या बाजूने मतदान करू द्या मग त्यांना महाराष्ट्र काय आहे हे कळेल, असा इशारा संजय राऊत यांनी दिला आहे.संजय राऊत यांनी शरद पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसवर कठोर टीका केली आहे. राष्ट्रवादीच्या खासदारांनी आत्मचिंतन करून मतदान करावे. त्यांनी महाराष्ट्रविरोधी मतदान केल्यास त्यांचा एकही उमेदवार जिंकून येणार नाही.

राज्यातील २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे नियमानुकूल होणार

फडणवीस सरकारचा लोककल्याणकारी निर्णय, विधानसभा क्षेत्रस्तरीय आढावा समित्यांवर ११५ सहअध्यक्षांची नियुक्ती, घरांना कायदेशीर मालकी हक्क मिळण्याचा मार्ग मोकळा

वृत्तसंस्था, मुंबई

राज्यातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी १ जानेवारी २०११ पर्यंत झालेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याच्या मोहिमेला गती देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी गठित करण्यात आलेल्या विधानसभा क्षेत्रस्तरीय आढावा समित्यांवर विविध मतदारसंघांत ११५ सहअध्यक्षांची नियुक्ती केली आहे. याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले आहे की, १ जानेवारी २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे सरसकट पाडली जाणार नाहीत, मात्र जी अतिक्रमणे नियमांत बसत नाहीत किंवा सार्वजनिक हिताच्या जागांवर आहेत, ती काढून टाकली जातील. कमाल १,५०० चौरस फुटांपर्यंतचेच निवासी अतिक्रमण नियमित केले जाईल; त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळावर केलेले अतिक्रमण पाडण्यात येईल. नदीपात्र, नाले, गायरान, सार्वजनिक रस्ते, वने, स्मशानभूमी, खेळण्याची मैदाने आणि शाळा किंवा रुग्णालयांसाठी आरक्षित असलेल्या जमिनींवरील अतिक्रमणे कोणत्याही परिस्थितीत नियमित केली जाणार नाहीत. ही अतिक्रमणे हटवून तेथील बाधित कुटुंबांना प्रधानमंत्री आवास योजनेतून पर्यायी घरे दिली जातील.

डिलिमिटेशनला दक्षिण भारतातील पाच प्रमुख राजकीय पक्षांचे समर्थन, मोदी सरकारला पाठिंबा जाहीर

१२९ पैकी ७५ खासदार सरकारच्या साथीला

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

३० नोव्हेंबर ते ३ डिसेंबर दरम्यान संसदेच्या अधिवेशनात लोकसभा आणि राज्यसभेत डिलिमिटेशन विधेयक मांडले जाणार आहे. डिलिमिटेशन विधेयकाच्या निमित्तानं देशाच्या राजकारणातील घडामोडी वाढल्या आहेत. मतदारसंघ फेररचनेबाबत आक्रमक असणाऱ्या दक्षिण भारतातील राजकीय पक्षांनी भूमिका बदलल्याचं पाहायला मिळतंय. द्रमुक, टीडीपी, वायएसआरसीपी, भारत राष्ट्र समिती, जेडीएस या दक्षिण भारतातील पक्षांनी आता डिलिमिटेशन विधेयकाला पाठिंबा दिला आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी लोकसभेत परिसीमन (दुसरे) विधेयक, २०२६ मांडण्याबाबत विचार करण्याची शिफारस केली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळानं डिलिमिटेशन विधेयकाला शुक्रवारी मंजुरी दिली आहे. आता ते लोकसभा आणि राज्यसभेत मांडलं जाईल. राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील लोकसभेच्या जागांसह विधानसभेच्या जागांमध्ये ५० टक्के वाढीचा प्रस्ताव दिला आहे.

तामिळनाडूचे माजी मुख्यमंत्री आणि द्रमुकचे प्रमुख एम.के. स्टॅलिन यांनी पक्षाच्या खासदारांची बैठक झाल्यानंतर डिलिमिटेशनच्या विधेयकाचं समर्थन करत असल्याचं जाहीर केलं. नव्या विधेयकात आमच्या पक्षाच्या दोन मागण्यांचा समावेश करण्यात आला आहे. प्रत्येक राज्यात ५० टक्के जागा वाढवण्याचा निर्णय दक्षिणेतील राज्यांचा विजय असल्याचं द्रमुकच्या नेत्यांनी म्हटलं.

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री आणि तेलुगु देसम पार्टीचे प्रमुख चंद्राबाबू नायडू यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत डिलिमिटेशन हे पंतप्रधान मोदींचं ऐतिहासिक पाऊल आणि सर्वांसाठी विन विन स्थिती असल्याचं म्हटलं. केवळ लोकसंख्येच्या आधारे परिसीमन झालं तर दक्षिण भारतातील राज्यांचं नुकसान झालं असतं. मात्र, ५० टक्के जागा वाढल्यानं ती शंका दूर झाली आहे. दक्षिण भारतातील ५ राज्यांच्या जागा १२९ वरुन १९५ वर जातील आणि दक्षिणेची भागीदारी २३.७६ टक्के वाटा सुरक्षित राहील. आंध्र प्रदेश २५ वरुन ३८, तामिळनाडू ५९, कर्नाटक ४२, तेलंगाणात २६ आणि केरळमधील जागा ३० होतील.

तेलंगाणातील भारत राष्ट्र समितीचे कार्याध्यक्ष केटी रामा राव यांनी दक्षिण भारताची २४ टक्के भागीदारी सुरक्षित राहणार असल्याची आशा असल्यान पाठिंबा देत असल्याचं म्हटले. आंध्र प्रदेशातील उपमुख्यमंत्री आणि जनसेना पक्षाचे प्रमुख पवन कल्याण २०५१ पर्यंत सध्याची टक्केवारी कायम ठेवून ५० टक्के जागा वाढवल्यानं लोकशाही भक्कम होण्यास मदत होईल. तर, जगनमोहन रेड्डी यांच्या वायएसआरसीपीनं देखील परिसीमन विधेयकाला पाठिंबा देणार असल्याचं म्हटलंय.

जेडीएसचे नेते आणि केंद्रीय मंत्री एचडी कुमारस्वामी यांनी एनडीएचे मित्रपक्ष म्हणून परिसीमन आणि महिला आरक्षणासंदर्भातील विधेयकाचं समर्थन केलं आहे. दक्षिणेच्या राज्यांचं यामध्ये नुकसान होणार नसल्याचं कुमारस्वामी यांनी म्हटलं.

दक्षिण भारतातील ६० टक्के खासदारांचं समर्थन

द्रमुक, भारत राष्ट्र समिती, वायएसआरसीपी, टीडीपी, जनसेना आणि जनता दल धर्मनिरपेक्ष या दक्षिण भारतातील पक्षांचे ६० टक्के खासदार परिसीमन विधेयकाच्या बाजूनं असल्याचं स्पष्ट झाले आहे.

संपादकीय लेखणीतून...

विधेयकाचे अधिवेशन

केंद्र सरकारने संसदेचे विशेष अधिवेशन ३० नोव्हेंबरपासून बोलावण्याचा प्रस्ताव दिला आहे. या विशेष अधिवेशनात मतदारसंघ पुनर्रचनेशी संबंधित महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक पुन्हा मांडले जाण्याची शक्यता आहे. ३ डिसेंबरपर्यंत हे अधिवेशन चालेल. केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी गुरुवारी विशेष अधिवेशनाबद्दल माहिती दिली. लोकसभा अध्यक्ष आणि राज्यसभेच्या सभापतींना अनुक्रमे ३० नोव्हेंबर (सोमवार) आणि २ डिसेंबर (बुधवार) रोजी दोन्ही सभागृहांचे कामकाज पुन्हा सुरू करण्याची विनंती सरकारने केली आहे. या अधिवेशनात आवश्यक सरकारी कामकाज पार पाडले जाणार आहे. कामकाजाच्या गरजेनुसार दोन्ही सभागृहांचे अधिवेशन ३ डिसेंबर २०२६ रोजी संपण्याची शक्यता आहे. हे विशेष अधिवेशन पावसाळी अधिवेशनाचा विस्तार असेल. संसदेचे कामकाज १३ ऑगस्ट रोजी अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आले होते. मात्र, अधिवेशन अद्याप औपचारिकरीत्या समाप्त करण्यात आलेले नाही. विशेष अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक होणार आहे.त्यात मतदारसंघ पुनर्रचनेशी संबंधित महिला आरक्षण विधेयकावर चर्चा होण्याची शक्यता आहे.

केंद्र सरकार ३३ टक्के महिला आरक्षण विधेयक व त्या संबंधित मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मंजूर करण्यासाठी दोन तृतीयांश बहुमत जुळवण्याच्या प्रयत्नात आहे. विधेयक मंजूर होण्यासाठी सरकारसमोर संख्याबळाचे आव्हान आहे. घटनादुरुस्ती विधेयकाला लोकसभेत दोन तृतीयांश म्हणजेच ३६१ मतांची गरज आहे. ३ जागा रिक्त असल्यामुळे सध्या सभागृहात ५४० सदस्य आहेत. सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडे (एनडीए) ३२० सदस्य आहेत. त्यामुळे विधेयक मंजूर करून घेण्यासाठी त्यांना विरोधी पक्षांच्या पाठिंब्याची गरज आहे.मतदारसंघ पुनर्रचनेबाबत दक्षिणेकडील राज्यांचा चिंता दूर करण्यासाठी सरकार राज्यनिहाय लोकसभा जागांमध्ये ५० टक्के वाढ करण्याच्या सूत्रावर विचार करत असल्याचे सांगितले जाते. प्रस्तावित आराखड्यात १९७१ च्या जनगणनेनुसार राज्यांमधील जागांचे विद्यमान प्रमाण कायम ठेवण्याचाही विचार आहे. मात्र, याबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. लोकसभेची सदस्यसंख्या ५४३ वरून ८५० पर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव या घटनादुरुस्ती विधेयकात आहे. विधेयक मंजुरीसाठी विरोधी पक्षांच्या पाठिंब्याची गरज भासणार आहे. एप्रिलमध्ये विधेयक फेटाळले गेल्यानंतर राजकीय समीकरणे बदलली आहेत. विरोधी गटातील २६ खासदार सत्ताधारी आघाडीकडे आले आहेत. तृणमूल काँग्रेसचे २० बंडखोर नॅशनॅलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडियामध्ये विलीन झाले असून, त्यांनी एनडीएला पाठिंब्याचे आश्वासन दिले आहे. तसेच शिवसेना (ठाकरे गट) पक्षाचे सहा खासदार एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत दाखल झाले आहेत. त्यामुळे सरकारची स्थिती मजबूत झाली असली तरी विधेयक मंजूरीसाठी आणखी काही खासदारांचा पाठिंबा आवश्यक आहे.द्रमुकचे २२ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे (श. प.) आठ खासदार महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

राष्ट्रवादी काँग्रेस (श. प.) व द्रमुक या पक्षांनी दुरुस्तीसह आणल्या जाऊ शकणाऱ्या विधेयकाला विरोध दर्शवलेला नाही. याशिवाय आप, राष्ट्रीय जनता दल आदी विरोधी पक्षांनी मतदानात सहभागी न होण्याचा निर्णय घेतला तर केंद्र सरकारला घटनादुरुस्ती विधेयक मंजूर करण्यासाठी पुरेसे संख्याबळ जमवता येऊ शकते असे म्हटले जाते. केंद्र सरकारने अधिवेशन संस्थगित होऊन शंभराहून जास्त दिवस झाले तरी पावसाळी अधिवेशनाची समाप्ती केली नसल्याने ह्याविशेष अधिवेशनह्न बोलावले जाऊ शकते असा अंदाज होता. संसदेचे पावसाळी अधिवेशन १३ ऑगस्ट रोजी संस्थगित करण्यात आले होते. मात्र राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या अधिवेशनाच्या समाप्तीची घोषणा केली नव्हती. त्यामुळे सोमवारी सुरू होणारे चार दिवसीय अधिवेशन पावसाळी अधिवेशनाचाच भाग असेल. खरे पाहता, नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यामध्ये हिवाळी अधिवेशनाची सुरुवात होते. मात्र, यावेळी पावसाळी अधिवेशनच पुनर्स्थापित करण्यात आले आहे.

जॅग्वार: एक कीस्टोन मार्जार प्रजाती?

आंतरराष्ट्रीय जॅग्वार दिन दरवर्षी २९ नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. जॅग्वार या दुर्मिळ आणि शक्तिशाली वन्य प्राण्याचे संवर्धन करणे, अधिवास जपणे आणि त्याच्यासमोरील धोक्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे, हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. मुख्य माहितीः स्थापनाः मार्च २०१८ मध्ये न्यूयॉर्क येथील संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात झालेल्या "जॅग्वार २०३० फोरम" दरम्यान जॅग्वार असलेल्या देशांनी या दिवसाची सुरुवात केली. वैशिष्ट्येः जॅग्वार ही मध्य व दक्षिण अमेरिकेतील सर्वात मोठी जंगली मांजर आणि जगातील तिसरी सर्वात मोठी मार्जार प्रजाती आहे (वाघ आणि सिंहाच्या खालोखाल). पर्यावरणीय महत्त्वः हा एक "शिखर शिकारी - Apex Predator" आणि जैवविविधतेसाठी "छत्री प्रजाती- Umbrella Species" मानला जातो, ज्यामुळे जंगलातील परिसंस्था संतुलित राहण्यास मदत होते. प्रमुख धोकेः जंगलतोड व अधिवास नष्ट होणे, अवैध शिकार/तस्करी आणि मानव-वन्यजीव संघर्ष यामुळे जॅग्वारच्या संख्येवर परिणाम होत आहे. यावर उपाय म्हणून "जॅग्वार २०३० रोडमॅप" सारखे उपक्रम राबवले जातात. जॅग्वार- पँथेरा ओन्का ही मांजराची एक मोठी प्रजाती आहे आणि पँथेरा वंशातील एकमेव जिवंत सदस्य आहे, जो मूळचा अमेरिकेतील आहे. त्याच्या अंगावर फिकट पिवळ्या ते तपकिरी रंगाचे केस असतात, जे ठिपक्यांनी झाकलेले असतात आणि बाजूला गुलाबाच्या फुलांसारख्या नक्षीमध्ये बदलतात; काहींच्या अंगावर काळे ठिपके असतात. १.८५ मीटर (६ फूट १ इंच) पर्यंतची शरीराची लांबी आणि १५८ किलो- ३४८ पौंड पर्यंतचे वजन असलेला हा प्राणी अमेरिकेतील सर्वात मोठी आणि जगातील तिसरी सर्वात मोठी मांजराची प्रजाती आहे. जॅग्वारच्या शक्तिशाली चाव्यामुळे तो कासव आणि कच्छपांचे कवच भेदू शकतो आणि एक असामान्य शिकार पद्धत वापरतो: तो सस्तन प्राण्यांच्या भक्ष्याच्या कवटीला थेट कानांच्या मध्ये चावून मेंदूवर प्राणघातक आघात करतो. जॅग्वार - मराठी लेखनभेदः जग्वार, शास्त्रीय नावः Panthera onca हा अमेरिका खंडात आढळणारा मार्जार कुळातील शक्तिशाली शिकारी वन्यप्राणी आहे. वाघ आणि सिंहाच्या खालोखाल जगातील ही तिसरी सर्वात मोठी मांजर प्रजाती आहे.

संविधानाची ढाल की राजकीय संघर्षाचे शस्त्र?

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

भारतीय संविधान हा केवळ देशाचा राज्यकारभार चालवण्यासाठी लिहिलेला कायद्यांचा संग्रह नाही, तर तो या देशाच्या लोकशाहीचा आत्मा, सामाजिक न्यायाचा पाया आणि राष्ट्रीय ऐक्याचे सर्वोच्च प्रतीक आहे. स्वातंत्र्यानंतरच्या अनेक दशकांपासून या पवित्र ग्रंथाने देशातील विविधतेला एका सूत्रात बांधून ठेवले आहे. मात्र, गेल्या काही वर्षांपासून समकालीन भारतीय राजकारणात संविधानाचा ज्या पद्धतीने उल्लेख आणि वापर केला जात आहे, त्यावरून राजकीय विश्लेषक, घटनातज्ज्ञ आणि विचारवंतांमध्ये एक गंभीर वैचारिक चर्चा सुरू झाली आहे. अनेकांच्या मते, आजकाल संविधानाकडे संवादाचे आणि मार्गदर्शनाचे साधन म्हणून पाहण्याऐवजी त्याचा वापर एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी 'राजकीय शस्त्र' म्हणून केला जात आहे. निवडणुकीच्या प्रचारसभांपासून ते संसदेच्या सभागृहापर्यंत आणि सर्वैधानिक पदांच्या कार्यपद्धतीपर्यंत, संविधान आज सातत्याने राजकीय वादाच्या केंद्रस्थानी असल्याचे चित्र दिसून येते.

संविधानाच्या या वाढत्या राजकीय वापराकडे समाजातील विविध घटक दोन भिन्न दृष्टिकोनातून पाहतात. सत्ताधारी पक्षाचे समर्थक आणि अनेक राजकीय टीकाकारांचा असा आक्षेप आहे की, आजच्या स्पर्धात्मक राजकारणात विरोधक धोरणात्मक मुद्द्यांवर ठोस पर्याय देण्याऐवजी 'संविधान धोक्यात आहे' असा भावनिक प्रचार करून विशिष्ट मतदारांमध्ये भीती निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. दुसरीकडे, विरोधी पक्ष आणि नागरी हक्क कार्यकर्त्यांचा असा ठाम आरोप आहे की, सत्तेत असलेले पक्ष अनेकदा संवैधानिक संस्था, कायदे आणि घटनादुरुस्त्यांचा वापर सत्तेचे केंद्रीकरण करण्यासाठी आणि राजकीय विरोधकांवर दबाव आणण्यासाठी करतात. या दोन्ही बाजूंच्या आरोप-प्रत्यारोपांमुळे आणि समाज माध्यमांवर संविधानातील कलमांचे सोयीस्कर अर्थ काढण्याच्या प्रवृत्तीमुळे संविधानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन पक्षीय चष्म्यातून तयार होत असल्याची चिंता समाजशास्त्रज्ञ व्यक्त करतात. तथापि, अनेक कायदेतज्ज्ञ आणि सामाजिक अभ्यासक याकडे एका वेगळ्या व सकारात्मक नजरेतून पाहतात. त्यांच्या मते, जनआंदोलनांमध्ये किंवा राजकीय मंचांवर संविधानाचा उल्लेख वाढणे म्हणजे त्याचा शस्त्र म्हणून वापर करणे नव्हे, तर ती लोकशाही जागृतीची खूण आहे. जेव्हा सर्वसामान्य नागरिक, विशेषतः वंचित आणि उपेक्षित घटक आपल्या हक्कांसाठी संविधानाचा आधार घेतात आणि सत्ताधाऱ्यांना जाब विचारतात, तेव्हा संविधान हे शस्त्र न राहता नागरिकांच्या हक्कांची ढाल बनते.

निवडणुकीच्या रणांगणात संविधानाचे प्रतीकात्मक राजकारण किती प्रभावी ठरू शकते, याचे ठळक उदाहरण २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत पाहावला मिळाले. या निवडणुकीत विकासाचे मुद्दे, महागाई किंवा रोजगाराइतकेच महत्त्व संविधानाचा मुद्द्याला प्राप्त झाले होते. काँग्रेस आणि 'इंडिया' आघाडीच्या नेत्यांनी, विशेषतः राहुल गांधी यांनी प्रत्येक प्रचारसभेत संविधानाची छोटी लाल प्रत हातात धरून मतदारांशी संवाद साधला. सत्ताधारी भाजपचा 'अबकी बार ४०० पार' हा नारा संविधान बदलण्यासाठी आणि आरक्षण संपवण्यासाठी असल्याचा आक्रमक आरोप विरोधकांनी केला. राजकीय विश्लेषकांच्या मते, या 'संविधान बचाव' मोहिमेचा मतदारांच्या मानसिकतेवर खोल परिणाम झाला. याउलट, भाजप आणि त्यांच्या समर्थकांनी याला संविधानाच्या नावाखाली खोटा प्रचार करून मते मिळवण्याचा राजकीय डावपेच असे संबोधले. या दोन्ही बाजूंच्या संघर्षात एक गोष्ट मात्र निश्चित घडली, ती म्हणजे संविधानाला निवडणूक प्रचाराच्या केंद्रस्थानी आणण्यामुळे सामान्य मतदारांमध्ये आपल्या संवैधानिक अधिकारांबाबतची चर्चा आणि जागीव मोठ्या प्रमाणावर वाढली.

निवडणुकीच्या मैदानाप्रमाणेच देशाचे सर्वोच्च कायदेमंडळ असलेल्या संसदेतही संविधानावरील चर्चा धोरणात्मक संवादाऐवजी ऐतिहासिक आणि वैचारिक संघर्षाचे रूप घेताना दिसतात. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने भारतीय संविधानाचा स्वीकार केला आणि २६ जानेवारी १९५० रोजी ते देशभरात लागू झाले. या ऐतिहासिक प्रवासाला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त डिसेंबर २०२४ मध्ये लोकसभेत विशेष चर्चा आयोजित करण्यात आली होती. परंतु, या चर्चेतही संविधानाच्या मूल्यांचे सिंहावलोकन होण्यापेक्षा एकमेकांवर राजकीय हल्ले चढवण्यासाठीच संविधानाचा संदर्भ दिला गेला. त्यापूर्वीच, जुलै २०२४ मध्ये केंद्र सरकारने २५ जून हा दिवस (ज्या दिवशी १९७५ मध्ये देशात आणीबाणी लागू करण्यात आली होती) 'संविधान हत्या दिवस' म्हणून पाळण्याची घोषणा केली होती. इंदिरा गांधींच्या काळात आणीबाणी लादून नागरिकांचे मूलभूत हक्क हिरावून घेतले गेले होते, याची आठवण ठेवण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे सरकारने स्पष्ट केले; तर ऐतिहासिक घटनांचा वापर राजकीय प्रतीकात्मकतेसाठी आणि विरोधकांना लक्ष्य करण्यासाठी केला जात असल्याचा आरोप करत काँग्रेसने याविरोधात मध्य प्रदेश उच्च न्यायालयात धाव घेतली. संसदेतील ७५ या वर्षाच्या चर्चेतही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्या काळातील घटनादुरुस्त्या व शाह बानो प्रकरणाचा उल्लेख करत काँग्रेसवर संविधानाची मोडतोड केल्याचा आरोप केला, तर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वैचारिक भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत संविधानाच्या मूल्यांवर सतत हल्ले होत असल्याचा पलटवार केला.

संविधानाभोवतीच्या राजकीय वादाचा तीन प्रमुख पैलूंपैकी तिसरा आणि अत्यंत संवेदनशील पैलू म्हणजे संवैधानिक पदांचा वापर आणि केंद्र-राज्य संबंध. राज्यपाल, विधानसभा अध्यक्ष किंवा इतर स्वायत्त संस्थांच्या भूमिकेवरून केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये अनेकदा तीव्र संघर्ष पाहायला मिळाला आहे. तामिळनाडू, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र आणि कर्नाटक यांसारख्या राज्यांमध्ये, विशेषतः जिथे केंद्रापेक्षा वेगळ्या पक्षाची सत्ता आहे, तिथे विधेयकांना मंजुरी देण्यास विलंब करणे (कलम २००), राज्यपालांचे स्वेच्छाधिकार (कलम १६३), सरकार स्थापनेतील हस्तक्षेप किंवा राष्ट्रपती राजवट लागू करण्याची शिफारस करणे (कलम ३५६) यावरून मोठे घटनात्मक पेच निर्माण झाले आहेत. विविध राज्य सरकारे आणि कायदेतज्ज्ञांचा असा आरोप आहे की, अशा कृतींमधून संवैधानिक पदांचा पक्षीय हितासाठी वापर केला जातो, ज्यामुळे संघराज्य प्रणालीवर मोठा ताण येतो. याउलट, केंद्र सरकारचे प्रतिनिधी आणि दुसऱ्या एका विचारप्रवाहाचे मत आहे की, संवैधानिक पदांवर बसलेल्या व्यक्ती घटनेने दिलेल्या चौकटीत राहूनच प्रशासकीय शिस्त टिकवण्याचे कर्तव्य बजावतात. या संघर्षाची तीव्रता इतकी होती की, संवैधानिक मर्यादा स्पष्ट करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाला एस. आर. बोम्मई (१९९४) आणि नबाम रेबिया (२०१६) यांसारख्या ऐतिहासिक निकालांतून हस्तक्षेप करून राज्यपालांच्या अधिकारांवर मर्यादा आणाव्या लागल्या.

या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर संविधान सभेतील आपल्या ऐतिहासिक भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला इशारा आज अधिकच समयोचित वाटतो. बाबासाहेबांनी स्पष्ट शब्दांत सांगितले होते की, संविधान कितीही चांगले असले, तरी ते राबवणारे लोक चांगले नसतील, तर ते वाईट ठरते; आणि संविधान कितीही वाईट असले, तरी ते राबवणारे लोक चांगले असतील, तर ते चांगले ठरते. संविधानाचा मूळ गाभा हा न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या चार प्रमुख मूल्यांवर उभा आहे. लोकशाही व्यवस्थेत राजकीय पक्षांमध्ये सत्तेसाठी आणि विचारधारेसाठी स्पर्धा होणे स्वाभाविक आहे, परंतु या स्पर्धेत संविधानाचा वापर केवळ राजकीय कुरघोडीचे शस्त्र म्हणून होऊ नये, हीच सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा असते. संविधान हे कोणत्याही एका पक्षाचे किंवा विचारधारेचे नसून ते संपूर्ण देशाचे आहे. निवडणुकीचे व्यासपीठ असो, संसदेचे सभागृह असो किंवा सर्वैधानिक पदे असोत, जेव्हा या सर्वांमागे संवैधानिक नैतिकतेचा भक्कम आधार असेल आणि जागरूक नागरिक राजकीय घोषणाबाजीच्या पलीकडे जाऊन संविधानाची मूलतत्त्वे समजून घेतील, तेव्हाच हे संविधान कोणत्याही राजकीय वादाचे शस्त्र न बनता भारतीय लोकशाहीची अभेद्य ढाल बनून राहील.

थोडक्यात,भारतीय संविधान हे केवळ राजकीय सत्तासंघर्षाचे साधन नसून देशाच्या लोकशाहीचे संरक्षण करणारी आणि सामाजिक परिवर्तनाला दिशा देणारी सर्वोच्च शक्ती आहे. संविधानाचा वापर राजकीय स्वार्थासाठी नव्हे, तर जनतेचे अधिकार, समानता, न्याय आणि स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी झाला पाहिजे. सत्ताधारी असोत किंवा विरोधक, प्रत्येकाने संविधानिक मर्यादांचे पालन करणे आवश्यक आहे. संविधानाचे खरे सामर्थ्य त्यातील तरतुदींमध्ये नसून त्या मूल्यांचे प्रामाणिकपणे पालन करण्यात आहे. त्यामुळे संविधानाचे राजकारण करण्यापेक्षा संविधानाचा आदर, संरक्षण आणि अंमलबजावणी करणे हीच सशक्त लोकशाहीची खरी ओळख ठरली पाहिजे.

- ९५६१५९१४३०६

शेकडो हेक्टर शेतजमीन व जंगले विकासाच्या नावाखाली जमीनदोस्त होत असेल तर, मोकळा श्वास मिळेल कसा?

रमेश लांजेवार
नागपूर

राज्यात एकीकडे दुष्काळाची परिस्थिती,तर दुसरीकडे अलनिनोचा वाढता प्रभाव, पाणी टंचाई, गुराढोरांना चाऱ्याची कमतरता, वाढते तापमान, वाढते प्रदुषण, पर्यावरणाचे दुष्परिणाम यामुळे सर्वांचेच ढासळते आरोग्य, भुस्खलन, सुनामी, भुकंप या सर्पूण गोष्टी सरकारच्या डोळ्यासमोर असतांना सुध्दा विकासाच्या नावाखाली पृथ्वीला(निसर्गाला) छल्ली करतांना दिसत आहे. सरकारचे डोके जागेवर आहे की नाही कळायला मार्ग नाही! सध्याच्या परिस्थितीत विकासाच्या नावाखाली राज्यासह देशात मोठ्या प्रकल्पांच्या उभारणीसाठी जंगलतोड सुरू आहे. याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात शहरीकरण, औद्योगिकरण व सिमेंट रोडचे जाळे विणण्यासाठी मोठ्या प्रमाणात शेतजमीनी खरेदी करून जमीनदोस्त होत आहे. यामुळे वातावरणात आमुलाग्र बदल होत असल्याने पर्यावरणासह सर्पूण जीवसृष्टी धोक्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे. सरकार वृक्षलागवडीची जी भाषा करीत आहे त्यात काहीही तथ्य नसल्याचे दिसून येते.सरकारने सर्वप्रथम रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील २५३ हेक्टर जमीनीवर म्हणजे ६०० एकरवर सायडोंगर परिसरात एक मोठा ऊर्जा प्रकल्प 'टोरंट पॉवर' या कंपनीच्या ३,००० मेगावॅट क्षमतेच्या 'पंप स्टोरेज हायड्रो प्रोजेक्ट'साठी मोठ्या प्रमाणावर झाडे कापण्यास वनविभागाने योजना आखली होती यात २७०० झाडे कापली सुध्दा. परंतु त्याचा कडाडून विरोध झाला व या प्रकल्पावर तात्पुरती स्थगिती आली आहे. आता सरकारने अमरावती जिल्ह्यातील मेळघाटवर लक्ष केंद्रित केले आहे. मेळघाटातील अधिवासाच्या वैभवावर कुऱ्हाड चालविण्याच्या तयारी सरकार आहे. सरकारने १५०० मेगावॅट प्रकल्पासाठी २४० हेक्टर जमीनीवरील म्हणजे ५९३ एकर जमीनीवरील जंगलातील १ लाख ४९ हजार ४३६ झाडांची कत्तल करण्याचे लक्ष्य सरकारचे आहे.म्हणजे सरकार सर्वसामान्यांना व संपूर्ण जीवसृष्टीला स्लोपॉयझन देऊन मारणार की काय असे चित्र मेळघाटवरून दिसत आहे.परंतु रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील प्रकल्पावरून सुरू असलेल्या वादानंतर आता मेळघाटमध्येही या प्रस्तावित वृक्षतोडी विरोधात पर्यावरणवाद्यांनी आवाज उठवला आहे.

या प्रकल्पासाठी सुमारे २४० हेक्टर (५९३ एकर) वनक्षेत्र बाधित होईल व सरासरी सुमारे १ लाख ४९ हजार ४३६ झाडे तोडली जातील असा अंदाज वर्तविला जात आहे. त्याचप्रमाणे सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील तारळी प्रकल्प १५०.७४ हेक्टरमध्ये आहे म्हणजे ३७२.५ एकर यावर अदानी ग्रीन एनर्जीच्या १,५०० मेगावॅट तारळी उदंचन जलविद्युत प्रकल्प उभारणीच्या तयारीत सरकार आहे. परंतु याचा सयाजीराव शिंदे यांनी कडाडून विरोध केला आहे त्यामुळे या प्रकल्पावर स्थगिती येवू शकते.म्हणजे सरकारचे धोरण



असे दिसते की पर्यावरण बिघडले तरी चालेल प्रकल्प उभारायचे आणि उद्योगपतींचे व उद्योजकांचे पोट भरायचे यात सर्वसामान्य माणूस मेला तरी चालेल अशी हेकड भूमिका सरकारची दिसत आहे.परंतु आता राज्यातील जनतेनी निसर्गावर होत असलेला अपमान सहन करण्यास तयार नाही अशी शपथ घेतल्याचे दिसून येते.आज देशात महागाईचा मोठा डोंगर उभा आहे,शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नाही, शेतकरी आत्महत्यां करीत आहेत, शेतमजूर हवालदिल झाले आहेत त्यामुळे ते हताश आहेत हिचं त्यांची कमजोरी पहाता त्यांची शेतजमीन सरकार खरेदी करीत असावी असे चित्र दिसते आणि यातून उभारला जात आहे नवीन नागपूर प्रकल्प अंदाजे ६९२.०६ हेक्टर (सुमारे १,७१० एकर) क्षेत्रावर तयार होत आहे नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यातील गोधनी (रिठी) आणि लाडगाव (रिठी) गावांमध्ये हा प्रकल्प उभारला जात आहे.

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एनएमआर डीए) आणि (एनबीसीसी) यांच्या माध्यमातून इंटरनॅशनल बिझनेस अँड फायनान्स सेंटर (आयबीएफसी) च्या धर्तीवर हा विकास केला जात आहे.सरकार म्हणते की ही वनजमीन नाही, शेतजमीन आहे कर्जतमध्ये ३२,४९० वृक्ष आणि मेळघाटमध्ये १,४९,४३६ वृक्ष कटाई असा आकडा आला,कारण तिथे वन विभागाने वनजमिनीवरील झाडांची मोजणी करून परवानगी दिली होती.परंतु सरकारने लक्षात ठेवले पाहिजे की,६९२.०६ हेक्टर जमीन जरी शेतजमीन असली तरी या परिसरात हजारो झाडे आहेत आणि सरकारने त्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना जरी दिला असला तरी हा निसर्गावर आणि निघणाऱ्या अन्नधान्यावर घनाघाती प्रहार नाही का? आज नवीन नागपूर प्रकल्पाच्या उभारणीसाठी १७१० एकर जमीनीवर शहरीकरण होणार परंतु सरकारने हा विचार का केला नाही की,१७१० एकर जमिनीतुन राज्याला किती उत्पन्न मिळते. त्याचप्रमाणे १७१० एकरमध्ये फक्त शेतजमीनीच आहे हे कशावरून या परिसरात हजारो झाडे असतील या झाडाच्या सान्निध्यात राहणाऱ्या पशुपक्ष्यांचे काय होणार याचा विचार सरकारने का केला नाही? आज १७१० एकर मधील शेती धुर्इसपाट होणार सोबतच या परिसरात असलेली झाडेही जाणार अशा परिस्थितीत पर्यावरण शुद्ध हवा कोठून देईल? म्हणजे आज सरकार विकासाच्या व प्रकल्पांच्या नावाखाली पर्यावरणावर घणाघाती प्रहार करतांना दिसत आहे.सरकारने शेतकऱ्यांना शेती करण्यास प्रोत्साहीत करायला हवे होते. परंतु सरकार त्यांची शेतजमीन करोडो रूपयाम्ध्ये खरेदी करून अन्न साठ्यावर, अन्नदाता शेतकऱ्यांवर व निसर्गावर घणाघाती प्रहार करीत आहे असे मला वाटते.सरकारच्या या चुकीच्या धोरणामुळे मानव,पशुपक्षी व संपूर्ण जीवसृष्टीच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. राज्यात अलनिनोचा वाढता प्रभाव यामुळे पाण्याची पातळी खालावली आहे अनेक धरणे आटले आहेत व परिणाम स्वरूप आतापासूनच पाणी टंचाईचा सामना लोकांना करावा लागतो आहे.

कर्जत मधील २५३ हेक्टर,अमरावती जिल्ह्यातील मेळघाटमधील २४० हेक्टर, सातारा जिल्ह्यातील तारळी प्रकल्पासाठी १५०.७४ हेक्टर जमीन व नवीन नागपूर प्रकल्पासाठी वापरण्यात येणारी ६९२.०६ हेक्टर शेतजमीन याप्रमाणे एकूण १३३५.८ हेक्टर जमीनीवरील शेतजमीन व जंगले धुर्इसपाट होईल आणि याचा गंभीर परिणाम पर्यावरणावर होऊन मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू यांच्यापुढे भयावह समस्या निर्माण होतील व होरपळतील सरकारने जर या एकूण १३३५.८ हेक्टर जमीनीवरील म्हणजे ३२७५.५ एकरवर आपले नियोजित प्रकल्प उभारले आणि शहरीकरण केले तर राज्यातील हिरवागार गालिचा नेस्तनाबूत होईल व सर्वत्र अंधक्कार पसरलेला दिसेल आणि निसर्गासह मानव,पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू गुदमरून मृत्यूमुखी पडतील हेही तितकेच सत्य आहे यालाही नाकारता येत नाही.त्यामुळे सरकारने कोणतेही नवीन प्रकल्प उभारतांना निसर्गाचा, पर्यावरणाचा व संपूर्ण जीवसृष्टीचा गांभीर्याने विचार केला पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे.

आज अनेक जुने उद्योगधंदे बंद झाले आहेत किंवा बंद होण्याच्या मार्गावर आहेत त्याला जिवीत करण्याचे काम सरकारने केले पाहिजे. परंतु नवीन प्रकल्पाच्या नावाखाली किंवा नवीन शहर उभारणीसाठी शेतजमीन किंवा जंगल यांची कत्तल होणार नाही याचीही जातीने काळजी घेतली पाहिजे. कारण ५० वर्षे जुनी हजारो झाडे आज तोडली तर त्यापासून प्लांटस असलेले ऑक्सिजन किंवा त्यांच्या सान्निध्यात रहाणारे पशुपक्षी यांची किती भयावह अवस्था होईल याचाही विचार सरकारने केला पाहिजे. त्याचप्रमाणे एकवेळा शेतजमीन विकासाच्या नावाखाली धुर्इसपाट झाली तर त्यापासून मिळणारे लाखो टन अन्नधान्य येणार कोठून याचाही विचार सरकारने गांभीर्याने करायला हवा. आपण यावर वेळीच उपाययोजना केल्या नाही तर असे समजायला हरकत नाही की, आपण सर्व अकाली मृत्यूच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचलो आहोत असे म्हणायला हरकत नाही.जय जवान जय किसान, जय हिंद!

- ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com / ई-पेपर : epaper.sinhvani.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

दुर्मिळ आणि विंटेज फाउंटेन पेनचा अनोखा खजिना पाहण्यासाठी रसिकांची गर्दी

'ऑरेंज सिटी फाउंटेन पेन शो २०२६'चे दिमाखात उद्घाटन





दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

डिजिटल युगात हाताने लिहिण्याची सवय कमी होत असली, तरी लेखणीची जादू आजही कायम आहे. कुणासाठी फाउंटेन पेन हे केवळ लेखनाचे साधन, तर कुणासाठी तो जिव्हाळ्याचा छंद आणि संग्राहकांसाठी अनमोल ठेवा! अशाच दुर्मिळ, विंटेज आणि हस्तनिर्मित फाउंटेन पेनचा अनोखा खजिना पाहण्याची संधी नागपूरकरांना मिळाली. देश-विदेशातील नामांकित पेन आणि स्टेशनरी निर्मात्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण संग्रहाने सजलेल्या 'ऑरेंज सिटी फाउंटेन पेन शो २०२६'ला शनिवारी रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. चित्रकला महाविद्यालयात भरलेल्या या प्रदर्शनाला पेनप्रेमी, विद्यार्थी आणि संग्राहकांनी मोठी गर्दी केली.

ऑरेंज सिटी अक्षर फाउंडेशन आणि चित्रकला महाविद्यालय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या प्रदर्शनाचे उद्घाटन लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अतुल वैद्य यांच्या हस्ते फीत कापून आणि दीपप्रज्वलन करून झाले. यावेळी चित्रकला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी डॉ. वैद्य यांचे आकर्षक कॅरिकेचर साकारून त्यांना अनोखी भेट दिली. डॉ. वैद्य यांनी प्रदर्शनातील विविध पेन संग्रहांची पाहणी केली आणि या उपक्रमाचे कौतुक केले.

याप्रसंगी संयोजक तथा व्हीएमव्ही महाविद्यालयाचे प्राचार्य अभय मुद्दल, शासकीय चित्रकला महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. विश्वनाथ साबळे, संयोजक डॉ. अतीष बकाने आणि डॉ. पायल गोटेफोडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

प्रदर्शनात आसा, रंगा, मोही, लोटस, वझीर, एलिका, व्हिंटेज रायटिंग इन्स्ट्रूमेंट्स, पेन बुटीक नागपूर, ला पेन्स व्हिंटेज पेन्स आणि लिखित यांसारख्या नामांकित ब्रँड्स व संस्थांचे पेन संग्रहासाठी ठेवण्यात आले आहेत. दुर्मिळ डिझाइन्स, आकर्षक कलाकुसर, पारंपरिक शैली आणि हस्तनिर्मित पेनची वैशिष्ट्ये पाहण्यासाठी रसिकांनी विशेष उत्सुकता दाखवली. अनेकांनी आपल्या आवडीचे पेन खरेदी करण्याची संधीही साधली. या प्रदर्शनाचे आणखी एक आकर्षण ठरले ते म्हणजे 'पेन थेरपी' हे सत्र. पेन क्षेत्रातील प्रसिद्ध तज्ज्ञ युसूफ मन्सूर यांनी लेखनाच्या माध्यमातून तणावमुक्ती आणि एकाग्रता वाढविण्याचे महत्त्व विशद केले. पेन आणि कागदाचा नियमित वापर मानसिक आरोग्य व विचारक्षमता सुधारण्यासाठी कसा उपयुक्त ठरू शकतो, याचे प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन त्यांनी केले. देशातील नामांकित 'निब मिस्टर' समीर मेहता यांनी जुन्या पेनांची दुरुस्ती, निबचे कस्टमायझेशन आणि शाईचा प्रवाह सुरळीत ठेवण्याच्या तंत्रांची माहिती दिली. जुन्या पेनांना पुन्हा वापरण्यायोग्य बनविण्याच्या त्यांच्या कौशल्याने पेनप्रेमींचे लक्ष वेधून घेतले.

डिजिटल युगात हरवत चाललेल्या हस्तलेखनाच्या आनंदाची पुन्हा ओळख करून देणे, लेखणीची परंपरा जपणे आणि पर्यावरणपूरक लेखन साहित्याच्या वापराला प्रोत्साहन देणे हा या प्रदर्शनामागील मुख्य उद्देश आहे. जुन्या आठवणी, कलात्मकता आणि लेखनाची आवड यांचा सुंदर संगम घडविणाऱ्या या शोने नागपूरकरांना लेखणीच्या दुनियेची अनोखी सफर घडवली.

चंद्रपुरात महाराष्ट्रातील पहिला २५१ कुंडीय गायत्री महायज्ञ ९ ते १२ जानेवारीदरम्यान

दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर-धनंजय पांढरे

राष्ट्रनिर्माण, संस्कारसंवर्धन आणि सामाजिक प्रबोधनाचा संदेश देण्यासाठी आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून चंद्रपुरात महाराष्ट्रातील पहिल्या २५१ कुंडीय गायत्री महायज्ञाचे आयोजन करण्यात येत आहे. राष्ट्र शौर्य समृद्धी २५१ कुंडीय गायत्री महायज्ञ व व्यसनमुक्ती संकल्प सोहळा ९ ते १२ जानेवारी २०२७ या कालावधीत पार पडणार आहे. या माध्यमातून राष्ट्रजागरण, युवा पिढीमध्ये संस्कारांची रुजवण, आध्यात्मिक चेतना आणि व्यसनमुक्त समाजनिर्मितीचा संदेश दिला जाणार आहे. या महायज्ञाच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून रविवार, २९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता श्री वेदमाता गायत्री शक्तिपीठ, श्रीराम सेतू मार्ग, दाताळा येथे भूमिपूजन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. शांतिकुंज, हरिद्वार येथील गायत्री तीर्थाचे व्यवस्थापक योगेंद्रजी गिरी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा होणार असून, आमदार सुधीर मुनगंटीवार आणि सपनाताई मुनगंटीवार यांचीही उपस्थिती राहणार आहे.

महायज्ञाच्या निमित्ताने निबंध आणि घोषवाक्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा २१ डिसेंबर रोजी गांधी चौकातील महानगरपालिका मैदानावर होणार आहे. निबंध स्पर्धेतील २० गुणवंत विद्यार्थ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चहापान आणि संवाद साधण्याची विशेष संधी मिळणार आहे. युवकांमध्ये राष्ट्रप्रेम, सामाजिक जाणीव आणि सकारात्मक विचार रुजविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. ९ जानेवारी रोजी भव्य मंगल कलश यात्रेने महायज्ञाच्या कार्यक्रमांना सुरुवात होईल. १० ते १२ जानेवारीदरम्यान २५१ कुंडीय गायत्री महायज्ञ संपन्न होणार आहे. या चार दिवसांत विशाल पुस्तक व चित्र प्रदर्शन तसेच व्यसनमुक्ती प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. १० जानेवारीला गोसंवर्धन प्रदर्शन आणि कृषी संमेलन, ११ जानेवारीला नारी जागरण संमेलन व दीप महायज्ञ, तर १२ जानेवारीला राज्यस्तरीय युवा संमेलन आयोजित करण्यात आले आहे. अखिल विश्व गायत्री परिवार, चंद्रपूर यांच्या आयोजनातून आणि आमदार सुधीर मुनगंटीवार व सपनाताई मुनगंटीवार यांच्या संयोजनातून हा महायज्ञ साकारत आहे. आध्यात्मिक साधनेसोबतच व्यसनमुक्ती, गोसंवर्धन, कृषी विकास, महिला सक्षमीकरण आणि युवा प्रबोधन असे विविध विषय या सोहळ्याच्या माध्यमातून हाताळले जाणार आहेत. त्यामुळे हा उपक्रम धार्मिक आयोजनापुरता मर्यादित न राहता सामाजिक परिवर्तन आणि राष्ट्रजागरणाचे व्यासपीठ ठरणार आहे. या महायज्ञासाठी देशाच्या विविध भागांतून भाविक, गायत्री परिवाराचे साधक आणि नागरिक मोठ्या संख्येने चंद्रपुरात येण्याची अपेक्षा आहे. महाराष्ट्रात प्रथमच अशा स्वरूपाचा २५१ कुंडीय गायत्री महायज्ञ आयोजित होत असल्याने चंद्रपूर जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब मानली जात आहे. या महायज्ञाच्या भूमिपूजन सोहळ्यासह मुख्य कार्यक्रमात नागरिकांनी सहकुटुंब मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.

ग्रा पं कार्यालय चाचेर येथे संविधान दिवस उत्साहात साजरा

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू:मौदा : गुरुवार (ता.२६ नोव्हेंबर)ला ग्रा पं कार्यालय चाचेर येथे सरपंचा लुंबिनी महेश कलारे यांच्या हस्ते फोटोचे पूजन करून भारतीय संविधानाची शपथ घेऊन संविधान दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी ग्रा.पं.अधिकारी वसंता बावणे, ग्रा.पं. लिपिक चंद्रशेखर देवगडे, रामानंद खडसे, आकाश राऊत, लक्ष्मण काळे, उमेश झलके, धिरज ठाकरे उपस्थित होते.वावेळी उपस्थित सर्वांनी संविधानातील मूल्यांचे जतन करण्याची व संविधानाच्या आदराची शपथ घेतली.



मुदत संपूनही मंजुरीविना कोट्यवधींची कामे सुरूच : पप्पू देशमुखांचा मनपा प्रशासनाला जाब

दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर-धनंजय पांढरे

महानगरपालिकेचा अमृत २.० अभियानांतर्गत सुरू असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या तीन महत्त्वपूर्ण विकासकामांमध्ये अनियमितता झाल्याचा मुद्दा नगरसेवक पप्पू देशमुख यांनी उपस्थित केला आहे. कामांची निर्धारित मुदत संपूनही आवश्यक प्रशासकीय व शासनस्तरीय मंजुरी न घेता कंत्राटदारांकडून कामे सुरू ठेवण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. या प्रकरणात संबंधित कंत्राटदारांसह जबाबदार महानगरपालिका अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी गुरुवारी झालेल्या महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत केली. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन महापौर संगीता खांडेकर यांनी सभागृहात दिले.केंद्र शासनाच्या अमृत २.० अभियानांतर्गत चंद्रपूर शहरात ३० कोटी रुपयांचे रामाळा तलाव पुनर्जीवन, २७०.१३ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना आणि ५४२.०५ कोटी रुपयांची मलनिस्सारण योजना अशी तीन मोठी विकासकामे सुरू आहेत. मात्र, या तिन्ही कामांची निर्धारित मुदत संपूनही कामे अद्याप अपूर्ण आहेत. विशेष म्हणजे, मुदतवाढीची अंतिम मंजुरी मिळण्यापूर्वीच कामे सुरू ठेवण्यात आल्याचा आक्षेप पप्पू देशमुख यांनी घेतला.



रामाळा तलाव पुनर्जीवन प्रकल्पाचे कंत्राटदार रोहित भोंगळे यांना १९ ऑगस्ट २०२४ रोजी कार्यादेश देण्यात आला होता. दीड वर्षांची कामाची मुदत १८ फेब्रुवारी २०२६ रोजी संपली. मात्र, मुदतीपर्यंत या प्रकल्पाचे केवळ ५० टक्के काम पूर्ण झाले. त्याचप्रमाणे, अमृत पाणीपुरवठा योजनेचे काम मेसर्स लक्ष्मी इंजिनिअरिंग सर्व्हिसेस प्रा. लि., कोल्हापूर यांना २१ फेब्रुवारी २०२४ रोजी देण्यात आले होते. या कामाची मुदत २२ फेब्रुवारी २०२६ रोजी संपली असून, आतापर्यंत केवळ ४० टक्के काम पूर्ण झाले आहे.

तर मलनिस्सारण योजनेचे काम मेसर्स ईगल इन्फ्रा इंडिया लि., उल्हासनगर यांना ११ मार्च २०२४ रोजी देण्यात आले होते. या कामाची निर्धारित मुदत १० मार्च २०२६ रोजी संपली. मात्र, या कालावधीत केवळ ३० टक्केच काम पूर्ण झाल्याची माहिती देशमुख यांनी सभागृहात मांडली. तीनही महत्त्वपूर्ण प्रकल्पांची मुदत संपल्यानंतरही कामे अपूर्ण असताना, मुदतवाढीसाठी आवश्यक असलेली प्रशासकीय आणि शासनस्तरीय अंतिम मंजुरी न घेताच कामे सुरू ठेवण्यात आल्याचा आरोप देशमुख यांनी केला. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे कंत्राटदारांना अभय मिळत असून, सार्वजनिक निधीतून सुरू असलेल्या कोट्यवधींच्या विकासकामांमध्ये जबाबदारी निश्चित होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.या प्रकरणाची सखोल चौकशी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित कंत्राटदारांसह जबाबदार मनपा अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. त्यामुळे अमृत अभियानातील या तीन मोठ्या प्रकल्पांच्या कामकाजा वरून महानगरपालिका प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, महापौरांनी दिलेल्या चौकशीच्या आश्वासनानंतर पुढील कारवाईकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

दोन फरार आरोपी भंडारा पोलिसांच्या जाळ्यात!

११ महिन्यांपासून होते फरार, दोन दिवसांत दोघांना अटक

दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर

वैनगंगा नदीच्या पुलावर ट्रक अडवून चालकाला मारहाण करीत जबरी लूटमार तसेच ट्रकची तोडफोड केल्याप्रकरणी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत कारवाई करण्यात आलेल्या दोन फरार आरोपींना भंडारा पोलिसांनी अवघ्या दोन दिवसांत अटक करण्यात यश मिळविले ११ महिन्यांपासून हे आरोपी पोलिसांना गुंगारा देत होते.

प्राप्त माहितीनुसार, दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी रात्री सुमारे १.३० वाजताच्या सुमारास फिर्यादी अक्रम खान उस्मान खान पठाण (वय ४५, रा. हसन, कर्नाटक) हे ट्रक क्रमांक KA18C4845 घेऊन रायपूरहून नागपूरकडे जात असताना कोरंभीजवळील वैनगंगा नदीच्या पुलावर आरोपींनी ट्रक अडविला. त्यानंतर चालकाला मारहाण करून ट्रकची काच फोडली. यात अंदाजे ५० हजार रुपयांचे नुकसान झाले. तसेच चालकाच्या खिशातील १५ हजार रुपये जबरीने हिसकावून घेतले. या प्रकरणात चिराग नामदेव गजभिये (रा. रमाबाई आंबेडकर वॉर्ड, भंडारा), मोनार्थ प्रकाश शेंडे (वय २५, रा. विधानगर, गणेशपूर) आणि अस्मित उर्फ रामा रामेश्वर कुकडे (रा. वडोदा, ता. मोहाडी, जि. नागपूर) यांच्यासह अन्य साथीदारां विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे संघटित स्वरूप लक्षात घेऊन महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) १९९९ अंतर्गत वाढीव कलमे लावण्यात आली. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी फरार झाले होते. पोलिसांनी त्यांचा शोध घेण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले; मात्र आरोपी वारंवार पोलिसांना गुंगारा देत होते.



दरम्यान, २४ नोव्हेंबर २०२६ रोजी अस्मित उर्फ रामा रामेश्वर कुकडे हा वडोदा, ता. मोहाडी, जि. नागपूर येथे असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. वरिष्ठांच्या परवानगीने पोलिसांनी सापळा रचून त्याला अटक केली. त्यानंतर २५ नोव्हेंबर रोजी मोनार्थ प्रकाश शेंडे हा मौजा मेंढा, पोस्ट मानेगाव (बाजार) येथे मंडई कार्यक्रमाला जाणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी परिसरात सापळा रचून त्यालाही ताब्यात घेतले. ही कारवाई पोलीस अधीक्षक गौरव हसन, अपर पोलीस अधीक्षक निखिल मोरे, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी तेजस सराडा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या कारवाईत भंडारा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उल्लास भुसारी, पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सहभाग घेतला. पोलिसांच्या या यशस्वी कारवाईमुळे फरार आरोपींना अटक करण्यात यश आले असून, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या आरोपींना पोलिसांचा धाक निर्माण झाला आहे.

थोडक्यात

धर्मेंद्र भुते यांची माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलिसमित्र समितीच्या तुमसर तालुकाध्यक्षपदी नियुक्ती

दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर

माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलिसमित्र समितीच्या वतीने पत्रकार धर्मेंद्र रुपराम भुते यांची तुमसर तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य अध्यक्ष महेश सारणीकर यांनी नियुक्तीपत्र देऊन त्यांचे अभिनंदन केले. माहिती अधिकार आणि पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असताना येणाऱ्या अडचणी सोडविणे, पत्रकारांच्या हक्कांचे संरक्षण करणे तसेच माहिती अधिकार चळवळ अधिक सक्षम व प्रभावी करण्याच्या उद्देशाने ही नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष सरदारामंत कुलकर्णी, महाराष्ट्र राज्य सचिव सचिन शेवाळे तसेच भंडारा जिल्हा उपाध्यक्ष अमृतलाल चरडे यांच्या शिफारशीनुसार धर्मेंद्र भुते यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.



संघटनेच्या माध्यमातून लोकशाही मूल्यांचे जतन, सामाजिक न्याय आणि हक्कांच्या संरक्षणासाठी कार्य करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. धर्मेंद्र भुते यांच्या नियुक्तीबद्दल त्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत असून, पुढील सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

'मास्वे'च्या उपोषणाचा आज तेरावा दिवस, आंदोलन तीव्र करण्याचा शासनाला इशारा



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

समाजकार्य कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कांसाठी, समानतेच्या तत्त्वासाठी आणि समाजकार्य शिक्षणाच्या सन्मानासाठी महाराष्ट्र असोशिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स (मास्वे) तर्फे सोमवार दि. १६ नोव्हेंबर २०२६ पासून सह संचालक, उच्च शिक्षण नागपूर यांचे कार्यालया समोर आत्मक्लेश आंदोलना अंतर्गत सुरु करण्यात आलेल्या २४ तासाच्या साखळी उपोषणाचा आज १३ वा दिवस असून आंदोलनात राज्यातील समाजकार्य महाविद्यालयांचे कर्मचारी सहभागी होत आहेत. आज डॉ. निशा वाघमारे, डॉ, विजया महाजन, प्रा. डॉ. अभय जाधव प्रा.डी. संदिप जगदाळे, डॉ. जितेन्द्र गांधी, मनिषा कराड, अजय देवधर, वैभव सुपेकर, पांडुरंग थाटकर, सचिन लंगोटे, अमोल सुपाते व बाहुबली कुगे उपोषणाला बसले आहेत.

महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी समाजकार्य महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांबाबत एक महिण्यात कार्यवाही करावे असे उच्च शिक्षण विभागाला ३ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत निर्देश दिले होते परंतु उच्च शिक्षण विभागाने अद्यापही मागण्यांची पुर्तता न केल्यामुळे मास्वेह्वला आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागलेला आहे. उच्च शिक्षण विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या कला, वाणिज्य, विज्ञान आदी महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या लाभांपासून उच्च शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील समाजकार्य महाविद्यालयांचे कर्मचारी वंचित आहेत. उच्च शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली असूनही समाजकार्य महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांना शासना तर्फे देण्यात येणाऱ्या भेदभाव व असमानतेच्या विरुद्धचा हा संघर्ष असून शासनाने मागण्यांची त्वरीत पुर्तता न केल्यास अन्याय आणि भेदभावा विरुद्धचा हा लढा अधिक तीव्र करण्यात येईल असा इशारा 'मास्वे' संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. अंबादास ये. मोहिते व महासचिव डॉ. संजय फुलकर यांनी दिला आहे.

दरम्यान महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी वित्त व वनमंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार, शिक्षक आमदार सुधाकर अडबले, आमदार धिरज लिंगाडे, आमदार किरण सरनाईक, आमदार संजय मेश्राम, आमदार सुरेश भोळे, माजी आमदार सुधाकर कोहळे, माजी आमदार नागो गाणार, माजी आमदार शिरिष चौधरी, माजी आमदार सेवक वघाये तसेच एमफुक्टो, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर टिचर्स असोशिएशन आदिंनी समाजकार्य महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांच्या मागण्या रास्त असल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी मागण्यांची तातडीने पुर्तता करावी असे आवाहन केले आहे.

नागपुरात पहिल्यांदाच व्यावसायिक पेजेंटचा जल्लोष! ६ डिसेंबरला ग्रँड फिनाले; अभिनेता सिद्धार्थ निगमची प्रमुख उपस्थिती



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

शहरातील फॅशन आणि पेजेंट क्षेत्राला नवी ओळख मिळवून देण्यासाठी कारा झोया प्रा. लि. तर्फे 'ज्युनियर इंडिया २०२६' आणि 'मिस अँड मिसेस महाराष्ट्र २०२६' या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. ४ ते ६ डिसेंबरदरम्यान बीटीपी फार्म्स अँड रिसॉर्ट येथे हा तीन दिवसीय सोहळा रंगणार असून, ६ डिसेंबरला अंतिम फेरी पार पडेल. अभिनेता सिद्धार्थ निगम हा सेलिब्रिटी पाहुणा म्हणून उपस्थित राहणार आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून सहभागी स्पर्धकांना केवळ रॅम्प वॉक आणि विजेतेपदापुरते मर्यादित न ठेवता व्यावसायिक प्रशिक्षणाची संधी दिली जाणार आहे. यामध्ये ग्रूमिंग, रॅम्प वॉक, व्यक्तिमत्त्व विकास, संवाद कौशल्य आणि स्टेज प्रेझेन्स यांसारख्या बाबींवर मार्गदर्शन केले जाईल. अनुभवी सुपरमॉडेल्स आणि इंडस्ट्रीतील तज्ज्ञ प्रशिक्षण देणार असून, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यवर परीक्षक स्पर्धकांचे मूल्यमापन करतील. कारा झोया प्रा. लि.च्या संस्थापक झोया सिराज शेख यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. 'मिसेस युनिव्हर्स २०२२' स्पर्धेत त्यांनी थर्ड रनरअपचा किताब पटकावला होता. गेल्या तीन वर्षांपासून त्या राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पेजेंट स्पर्धांचे आयोजन करीत आहेत. पुणे, मुंबई, गोवा आणि जयपूर येथील आयोजनानंतर आता नागपुरात हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

थोडक्यात

महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

क्रांतिसूर्य राष्ट्रपिता महात्मा जोतिबा फुले यांच्या स्मृति दिनानिमित्त नागपूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाच्या वतीने शनिवारी २८ नोव्हेंबर रोजी फुले मार्केट, कॉटन मार्केट, नागपूर येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी



महात्मा जोतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी विनम्र अभिवादन केले. महात्मा फुले यांनी स्त्रीशिक्षण, सामाजिक समता, जातिभेद निर्मूलन आणि शोषित-वंचित समाजाच्या हक्कांसाठी केलेले कार्य ऐतिहासिक आहे. त्यांच्या सत्यशोधक विचारांनी भारतीय समाजात सामाजिक परिवर्तनाची मुहूर्तमेढ रोवली. आजही त्यांचे विचार सामाजिक न्यायाच्या लढ्याला प्रेरणा देणारे आहेत. महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमाला नागपूर शहर ओबीसी काँग्रेसचे अध्यक्ष प्रशांत पवार, अजय हटेवार, मोरेश्वर भादे, भूषण तल्हार, सचिन वैद्य, पिंकी सिंग भारत यात्री, चंद्रकांत हिंगे, प्रमोद शिंगणे, महेश श्रीवास, अशोक निखाडे, माधवराव गावंडे, संतोष गोटाफोडे, महादेव देने यांच्यासह नागपूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी आणि ओबीसी काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. महात्मा फुले यांच्या समता, बंधुता, शिक्षण आणि सामाजिक न्यायाच्या विचारांवर आधारित समाजनिर्मितीसाठी संघटितपणे कार्य करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

माणसं घडविणारा नेहमीच सत्कारास पात्र : राजकुमार बडोले

ग्रंथमित्र डॉ. रमेश जनबंधू यांचा अमृत महोत्सवी नागरी सत्कार; केंद्रीय वाचनालयाचा हिरक महोत्सव उत्साहात

दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

वाचनालयाच्या माध्यमातून विद्यार्थी घडविण्याबरोबरच समाजाला वैचारिक दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य डॉ. रमेश जनबंधू यांनी केले आहे. माणसं घडविण्याचे काम करणारी व्यक्ती नेहमीच सत्कारास पात्र ठरते, असे गौरवोद्गार माजी मंत्री तथा आमदार राजकुमार बडोले



यांनी काढले. स्थानिक धर्मापूर पेठेतील केंद्रीय वाचनालयाचे संस्थापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण आणि राज्यस्तरीय ग्रंथमित्र पुरस्काराचे मानकरी डॉ. रमेश जनबंधू यांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केल्याबद्दल त्यांच्या अमृत महोत्सवी नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. तसेच, त्यांनी वयाच्या अवघ्या १५ व्या वर्षी स्थापन केलेल्या केंद्रीय वाचनालयाला ६० वर्षे पूर्ण झाल्याने वाचनालयाचा हिरक महोत्सवही शनिवारी (२८ नोव्हेंबर) संयुक्तपणे साजरा करण्यात आला. या सोहळ्याचा अध्यक्षस्थानावरून बडोले बोलत होते.

वाचनालयाच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमाला आमदार संजय मेश्राम, माजी आमदार सुधीर पारवे, बिरसा क्रांती दलाचे संस्थापक दशरथ मडावी, नगराध्यक्ष सुषमा श्रीराम, तहसीलदार संजय राठोड, गटविकास अधिकारी डॉ. चेतन जाधव, उपनगराध्यक्ष रुचित पंजलवार यांच्यासह नत्थू मेश्राम, कॉन्टन उतमराव साखरे, अजय समर्थ, नरेश चहादे, रामगोपाल सरदारे, नगरसेवक कैलास कोमरेल्लीवार, किरण नागरिकर, नंदू पाचभाई आणि दिनेश रामटेके उपस्थित होते. यावेळी नागरी सत्कार समितीच्या वतीने भिवापूरकरांतर्फे डॉ. जनबंधू यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना, ज्या शहरात जन्मलो, त्याच शहरातील नागरिकांनी केलेला सन्मान इतर सर्व सत्कारापेक्षा अधिक महत्त्वाचा आणि आनंददायी असल्याची भावना डॉ. जनबंधू यांनी व्यक्त केली. या सोहळ्याचे औचित्य साधून डॉ. जनबंधू यांच्या जीवनप्रवासावर आधारित संघर्षगुंफा या गौरवग्रंथाचे, तसेच केंद्रीय वाचनालयाच्या हिरक महोत्सवानिमित्त प्रकाशित करण्यात आलेल्या स्मरणिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष दिलीप गुप्ता यांनी स्वागतपर भाषणातून डॉ. जनबंधू यांच्या कार्याचा आणि जीवनप्रवासाचा थोडक्यात आढावा घेतला. प्रास्ताविक अशोक इंदूरकर यांनी केले. प्रा. मंगेश जनबंधू यांनी सूत्रसंचालन केले, तर लव जनबंधू यांनी आभार मानले.

बॉईज हायस्कूलमध्ये संविधान दिन साजरा, विद्यार्थ्यांच्या सहभागातून संविधान जनजागृती रॅली



दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

भिवापूर एज्युकेशन सोसायटीच्या बॉईज हायस्कूलमध्ये २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी बनसोड सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. निशानकर मॅडम यांनी संविधानातील मूलभूत मूल्ये, नागरिकांचे अधिकार आणि कर्तव्ये याविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. यानंतर विद्यार्थ्यांच्या सहभागातून शहरात संविधान जनजागृती रॅली काढण्यात आली. हातात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र आणि संविधानाची पुस्तिका घेऊन विद्यार्थ्यांनी संविधानाच्या जयघोषात रॅली काढली. या रॅलीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. बसस्थानक परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री गोमासे , गोवर्धन, जिभकाटे, सुषमा राऊत, अलका निशानकर, राजू हुडकन आणि अभय चव्हाण यांनी परिश्रम घेतले.

नागपुरात पट्टे वाटप व घरे देण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबवा : बावनकुळे

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील सर्वांना घरे ही योजना साकार करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीतील मनपा, राज्य सरकारच्या जागेवर वास्तव्याला असलेल्या सर्व पात्र नागरिकांना मालकीहक्काचे पट्टेवाटप करण्यासाठी येत्या मार्चपर्यंत कालबद्ध कार्यक्रम तयार करा, असे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर शहरातील विकास प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी आज (ता. २८) डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समितीच्या सभागृहात घेतली. यावेळी महापौर निता ठाकरे, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्तापक्ष नेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, आयुक्त डॉ. विपीन, अतिरिक्त आयुक्त अंकित, अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, सर्व झोनचे सभापती व मनपाचा विशेष समित्यांचे सभापती, मनपाच्या मुख्य अभियंता लिना उपाध्ये, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, विजय गुरुबक्षणी, नरेश बोरकर यांच्यासह सर्व उपआयुक्त सहायक आयुक्त यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शहरातील सर्वांना घरे देण्यासाठी राज्यशासन कटिबद्ध आहे. यासाठी मनपाच्या, एनआयटीच्या, राज्य सरकारच्या जागेवर असलेल्या सर्व झोपडपट्टीतील लोकांना मालकी हक्काचे पट्टे देण्यासाठी मोहिम महापालिकेतर्फे राबविण्यात यावी, यासाठी प्रत्येक प्रभागनिहाय नगरसेवकांच्या मदतीने सर्वेक्षण करण्यात यावे, यासाठी प्रत्येक प्रभागात शिबीर मनपाने आयोजित करावे. शहरातील एकही झोपडपट्टीधारक हा पट्टेविना राहणार नाही, याचा कार्यक्रम मार्च २०२७ पर्यंत पूर्ण करण्यात यावा. त्याचप्रमाणे त्यांना त्या जागेवर घर बांधण्यासाठी पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घर बांधून देण्याचा कार्यक्रम हाती घ्यावा, असे निर्देश पालकमंत्री बावनकुळे यांनी यावेळी दिले. त्याचप्रमाणे गुंठेवारी कायदा अंतर्गत खासगी लेआऊटमध्ये असलेल्या भूखंडधारकांना प्रापर्टी कार्ड देण्यासाठी योजना हाती घ्यावी, असेही यावेळी पालकमंत्र्यांनी सुचविले. तसेच अनधिकृतपणे लेआऊटचे नियमितीकरण युद्धपातळीवर करण्यात यावे, असेही निर्देश त्यांनी दिले.

कोलार-कन्हान बॅरेजला मंजुरी

नागपूर शहरासाठी शाश्वत पाणी पुरवठा करण्यासाठी कोलार-कन्हान बॅरेज बांधण्यासाठी राज्य सरकारने १४०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाला प्रशासकीय मंजुरी दिल्याची माहिती यावेळी पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी दिली. शहराला भविष्यात शाश्वत पाणी पुरवठा करण्यासाठी ही योजना गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेऊन नागपूर शहरासाठी आवश्यक असलेला हा प्रकल्पाला मंजुरी मिळाली आहे. फडणवीस यांनी २००४ मध्ये प्रकल्पासाठी पाठविरावा सुरू केला होते. यामुळे आता कोलार-कन्हान बॅरेज बांधण्यासाठी असलेल्या सर्व अडचणी आता दूर झाल्या आहेत. जलसंपदा विभागातर्फे बांधण्यात येणाऱ्या प्रकल्पातून नागपूर शहराला लागून असलेल्या परिसरातील नागरिकांना सुद्धा पाणी पुरवठा केला जाणार आहे. तसेच बावनकुळे यांनी भविष्यातील पाणी टंचाई लक्षात घेता शहरातील सार्वजनिक विहिरींचा उपयोग आवश्यकता असल्यास पिण्याचे पाणीसाठी करता यावा असे नियोजन करण्याचे निर्देशित केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेनुसार नागपूर शहरात सुरू असलेल्या विकास प्रकल्पांना पूर्ण करण्यासाठी निधीची कमतरता राहणार नाही, असे सांगून पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी हिवाळी अधिवेशनाच्या काळात निधीची आवश्यकता असलेल्या प्रकल्पाची माहिती द्यावी, या प्रकल्पाशी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक नागपुरात घेतली जाईल व प्रश्न निकाली काढण्यात येईल.

पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्र्यांकडून बल्लारपूर पाणीपुरवठा योजनेची पाहणी

दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर -धनंजय पांढरे



वंदा कमी पर्जन्यमानामुळे जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, बल्लारपूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या वर्धा नदीतील पाणीसाठाही मर्यादित आहे. उपलब्ध पाणीसाठा आगामी उन्हाळ्यापर्यंत टिकवून ठेवण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी गुरुवार दि २६ नोव्हेंबर रोजी वर्धा नदीवरील सुधारित बल्लारपूर पाणीपुरवठा योजना टप्पा-२ ची पाहणी केली. यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार उपस्थित होते. पाहणीदरम्यान पालकमंत्री डॉ. उईके यांनी बल्लारपूर शहरातील संभाव्य पाणीटंचाईचा आढावा घेत प्रशासनाला आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन आणि व्यवस्थापन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. बंद पडलेल्या बोअरवेल व विहिरींची दुरुस्ती करावी, पिण्याच्या पाण्याचा विहिरींचे सिमेंटीकरण करावे, तसेच नागरिक वापरत नसलेल्या विहिरींचा पाणीपातळी वाढविण्यासाठी उपयोग करता येईल का, याचे नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी नगर परिषद प्रशासनाला दिल्या.

आगामी काळात पाण्याची टंचाई अधिक तीव्र होण्याची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी आतापासूनच पाण्याचा काटकसरीने वापर करावा. यासाठी नगर परिषद प्रशासनाने जनजागृती मोहीम राबवावी, असे आवाहनही पालकमंत्र्यांनी केले. सन २०११ च्या जनगणनेनुसार बल्लारपूर शहराची लोकसंख्या ८९ हजार ४७२ होती. सन २०५० पर्यंत शहराची अंदाजित लोकसंख्या १ लाख ४३ हजारांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. सन २०२० मध्ये शहराची दरशेजची पाण्याची गरज १९.१५ दशलक्ष लिटर होती. हीच गरज सन २०५० पर्यंत २६.६९ दशलक्ष लिटर प्रतिदिन होण्याचा अंदाज आहे. सध्या शहरात एकूण ११ हजार १० नळजोडण्या असून, नियमितपणे १७ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा केला जातो. मात्र, सध्याच्या परिस्थितीत १० टक्के कपात करून दररोज १५ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा सुरू आहे. वर्धा नदीपात्रातील उपलब्ध पाणीसाठा फेब्रुवारी २०२७ अखेरपर्यंत पुरेल, असा अंदाज आहे. त्यानंतर उद्भवणारी संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन मार्च ते ऑगस्ट २०२७ या कालावधीसाठी निम्न वर्धा प्रकल्पातून २.६५ दशलक्ष घनमीटर पाण्याचे आरक्षण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

दरम्यान, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणतर्फे सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत सुधारित बल्लारपूर पाणीपुरवठा योजना टप्पा-२ राबविण्यात येत आहे. या योजनेतील रेडियल वेल पंप हाऊस, अप्रोच ब्रिज, अस्तित्वातील हेडवर्क्सची सुधारणा, अशुद्ध पाण्याची उर्ध्वनलिका, जलशुद्धीकरण केंद्राची सुधारणा, शुद्ध पाण्याची उर्ध्वनलिका, विद्यानगर येथील मुख्य संतुलन टाकी, शुद्ध पाण्याची गुरुत्वनलिका, जलशुद्धीकरण केंद्र परिसरातील उंच पाण्याची टाकी, दीनदयाळ वॉर्ड, कन्नमवार वॉर्डातील उंच पाण्याच्या टाक्या, वितरण व्यवस्था आणि जुन्या पाण्याच्या टाकीची दुरुस्ती यांसह अन्य किरकोळ कामे पूर्ण झाली आहेत. अशी माहिती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे कार्यकारी अभियंता संजय अष्टणी यांनी दिली.

यावेळी जिल्हाधिकारी वसुमना पंत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, बल्लारपूरचे उपविभागीय अधिकारी डॉ. अर्जुन पावरा, तहसीलदार रेणुका कोकाटे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी विशाल वाघ, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे कार्यकारी अभियंता संजय अष्टणी, मुकेश धकाते, हरीश शर्मा आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अनुसूचित जाती विभाग व काँग्रेसच्या क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांना अभिवादन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अनुसूचित जाती विभाग व काँग्रेसच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या वतीने आज क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. स्त्री शिक्षणाचा पाया रचणारे, शोषित-पीडित आणि वंचित समाजाच्या उन्नतीसाठी आयुष्यभर अविरत संघर्ष करणारे, शिक्षण, सामाजिक न्याय आणि मानवतेचा विचार समाजात रुजविणारे महात्मा ज्योतिराव फुले हे सामाजिक क्रांतीचे अग्रदूत होते. महिला शिक्षणाचे प्रणेते आणि सामाजिक समतेचे महान प्रवर्तक म्हणून त्यांचे कार्य सदैव प्रेरणादायी राहील. वाक्येळी महात्मा फुले यांच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या सामाजिक समता, शिक्षण आणि न्यायाच्या कायालां अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी शैलाताई जैमिनी (महासचिव, अनुसूचित जाती विभाग, महाराष्ट्र प्रदेश), प्रफुल्ल भाजे (अनुसूचित जाती काँग्रेस प्रदेश सचिव), राजेश रंगारी, सामाजिक कार्यकर्ते श्याम चौधरी, ब्लॉक अध्यक्ष रिजवान अन्सारी, दिलीप भोये, संतोष सिंह, किशन मोहलिया, गजानन चकोले, विजय शेंडे, क्रांती ढोक, राहुल पलाडे, निलय चोपडे, पुरुषोत्तम वाडीघरे, उमेश डेकाटे, मच्छिंद्र आवळे, चंद्रपाल सिंह, अकील अहमद, सूरज बुरबुरे, अनिकेत रंगारी, अशोक प्रजापती, राधेश्याम राजपूत, राजीव अंबादे, नरेंद्र मरघडे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

संविधान दिनानिमित्त बल्लारपूरमध्ये समतेचा जागर : हजारो नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती

दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-धनंजय पांढरे



भारतीय संविधान दिनानिमित्त संविधान उत्सव समिती व मित्र परिवार, बल्लारपूर यांच्या वतीने २६ नोव्हेंबर रोजी विद्यानगर वार्डातील पाली बौद्ध विहारासमोरील भव्य पटांगणावर संविधान दिन उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन, संविधान निष्ठेची शपथ, मान्यवरांचे मार्गदर्शन आणि प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्याला बल्लारपूर शहर व परिसरातील हजारो नागरिकांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शविली.

कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेच्या सामूहिक वाचनाने झाली. मंचावरील मान्यवरांसह उपस्थित हजारो नागरिकांनी हात उंचावून संविधानाप्रती निष्ठा राखण्याची शपथ घेतली. या सामूहिक शपथविधीमुळे संपूर्ण परिसरात संविधानिक मूल्यांविषयी आदर आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून खासदार प्रतिभा धानोरकर यांनी मार्गदर्शन केले. संविधान हे केवळ पुस्तक नसून प्रत्येक भारतीयाच्या जगण्याचा आधार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले अधिकार आणि कर्तव्ये समजून घेऊन तरुणांनी शिक्षण, संघर्ष आणि संघटनेच्या माध्यमातून प्रगती साधावी. संविधानाचे रक्षण करणे हेच खरे राष्ट्रप्रेम असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी आमदार सुभाष धोटे यांनी संविधानामुळे सर्व जाती-धर्मांच्या नागरिकांना समान हक्क मिळाले असून समतेचा हा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे हीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन केले. प्रा. दिलीप चौधरी यांनी संविधान निर्मितीचा इतिहास उलगडून सांगत विद्यार्थ्यांनी आणि तरुणांनी संविधानाचे वाचन करून त्यातील मूल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन केले. ॲड. फरहात बेग यांनी संविधानातील मूलभूत हक्क, धर्मनिरपेक्षता आणि सर्वधर्मसमभाव या विषयांवर मार्गदर्शन केले. संविधान हा सर्व धर्मीयांना एकत्र बांधणारा महत्त्वाचा धागा असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी बल्लारपूरचे उपविभागीय अधिकारी डॉ. अर्जुन पावरा, पोलीस निरीक्षक बिपीन इंगळे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी विशाल वाघ, ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. गजानन मेश्राम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता संजोग मेढे तसेच अनुसूचित जाती काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष पवन भगत यांची प्रमुख उपस्थिती होती. विविध क्षेत्रांतील सर्वधर्मीय धर्मगुरू, प्रशासकीय अधिकारी आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा यावेळी सत्कार करण्यात आला. बौद्ध भिक्खूंचा विशेष सन्मान करण्यात आला, तर खासदार प्रतिभा धानोरकर यांचाही आयोजकांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात धम्मरक्षित रणदिवे संघ, मुंबई यांच्या चमूने जागर समतेचा हा प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. काव्य, नाट्य, संगीत आणि आंबेडकरी शाहिरीच्या माध्यमातून सामाजिक समता, बंधुता आणि संविधानिक मूल्यांचा प्रभावी संदेश देण्यात आला. समतेचा जागर करणाऱ्या गीतांनी आणि शाहिरीने संपूर्ण पटांगण दणाणून गेले. उशिरापर्यंत नागरिकांनी या कार्यक्रमाचा आनंद घेतला.

कार्यक्रमाचे संचालन स्वेता जंगपल्लीवार आणि श्रीनिवास मासे यांनी केले, तर संतोष बेताल यांनी प्रास्ताविकातून संविधान दिनाचे महत्त्व, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या संविधानिक मूल्यांचे महत्त्व विशद केले. शेवटी आयोजक राजू झोडे यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणारे मान्यवर, प्रशासकीय अधिकारी, कार्यकर्ते, मित्र परिवारातील सदस्य आणि उपस्थित नागरिकांचे त्यांनी आभार मानले. यावेळी चेतन गेडाम, नागेश रवपारखी, संपत कोरडे, सचिन मेश्राम, गणपत इटनकर, जितेंद्र करमनकर, संजय झिल्लेवार, कर्मवीर सौदागर, देशपाल मून, राहुल गायकवाड, विवेक खुटेकमाटे, नरेश गुंडापल्ली, असलम शेख, वाझीद, आकाशकांत दुर्गे, आनंद रामटेके, प्रदीप झामरे, अनिल सुखदेवे, ॲड. मेघा भाले, प्रियंका नाईक, निरंजन काकू, सपना मोरे, बंडू पडवेकर, बंडू फुलझले, गुरु कामटे, मिलिंद गेडाम, अविनाश पोहणकर, किशोर मेश्राम, बशीर सिद्दीकी, किशन केसकर, प्रितम पाटील, विश्वास देशभ्रतार आदींसह बल्लारपूर शहर व परिसरातील हजारो महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या भव्य आयोजनाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

थोडक्यात

फत्तापुर येथे जीवंत नवजात अर्भक आढळले, वरोरा पोलिसांची मातेचा शोध घेत कारवाई

दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा-धर्मेंद्र शेरकुरे

वरोरा तालुक्यातील मौजा फत्तापूर येथे सुमारे पाच ते सहा तासांच्या नवजात बाळाला टाकून दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेची माहिती मिळताच वरोरा पोलिसांनी वेळ न वाया घालवता तातडीने घटनास्थळी धाव घेत बाळाला आपल्या ताब्यात घेतले व तात्काळ उपचारासाठी वरोरा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. बाळाची प्रकृती नाजूक असल्याने त्याला पुढील उपचारासाठी चंद्रपूर येथील जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये हलवण्यात आले आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून वरोरा पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवत मातेचा शोध घेतला.

गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी अवघ्या काही वेळातच संबंधित मातेचा शोध घेऊन तिच्यावर पुढील कायदेशीर कारवाई केली आहे या प्रकरणाचा पुढील तपास वरोरा पोलीस स्टेशनचे तपाशी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश झांबरे हे करीत आहे संकटात सापडलेल्या एका निष्पाप नवजात जीवाची समय सूचकता आणि तत्परतेने काळजी घेत तसेच तपासाची सूत्रे गतिमान ठेवून मातेचा शोध घेतल्याबद्दल वरोरा पोलिसांच्या या संवेदनशील व कौतुकास्पद कामगिरीचे सर्वत्र स्वागत व कौतुक होत आहे.त्या मातेने कोणाच्या दबावाखाली येऊन ते जिवंत अर्भक फेकून दिले याचा शोध वरोरा पोलीस घेत आहे.

हास्यकवी अशोक नायगावकर यांची काव्यमैफल ३० नोव्हेंबर रोजी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

साहित्य भारती, विदर्भ प्रदेश आणि लोकसेवा प्रतिष्ठान, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ हास्यकवी अशोक नायगावकर यांच्या हास्यकवितांची रंगतदार मैफल 'मिशा आणि हशा' ३० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता शिक्षक सहकारी बँक सभागृह, शुक्रवारी तलाव, महाल येथे आयोजित करण्यात आली आहे.



मैफलीच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी तथा भाजपा महाराष्ट्र प्रदेशचे उपाध्यक्ष डॉ. उपेंद्र कोठेकर राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून आमदार तथा लोकसेवा प्रतिष्ठान, नागपूरचे अध्यक्ष मोहन मते आणि माजी आमदार तथा शिक्षक सहकारी बँक, नागपूरचे अध्यक्ष प्रा.अनिल सोले उपस्थित राहतील. या विनामूल्य कार्यक्रमाला कार्यक्रमाला काव्यप्रेमी, साहित्यिक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन साहित्य भारतीचे अध्यक्ष चंद्रकांत लाखे, कार्याध्यक्ष डॉ. चंद्रशेखर भुसारी आणि महामंत्री विनय माहुरकर यांनी केले आहे.

चाचेर ते धापेवाडा तीर्थयात्रेला भक्तीमय सुरुवात, दुधराम सव्वालाखे यांचा सत्कार



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू:मौदा

श्री शंकर देवस्थान, चाचेर ते धापेवाडा या तीर्थयात्रेला शुक्रवार (ता.२७ नोव्हेंबर) ला भक्तीमय वातावरणात गावातील संपूर्ण महिला भजन मंडळाच्या वतीने सुरुवात झाली. माजी जि.प सदस्य नागपूर दुधराम सव्वालाखे यांच्या विशेष सहयोगातून व सहकार्यातून ही तीर्थयात्रा काढण्यात आली. त्याबद्दल श्री शंकर देवस्थान मंदिर व भाविक मंडळींकडून दुधराम सव्वालाखे यांचे विशेष आभार मानून त्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी ग्रा प चाचेर सरपंचा लुंबिनी महेश कलारे,सामाजिक कार्यकर्ते विनोद कोपरकर, शैलेश कोपरकर, गोपीचंद राऊत, रामू खंडाईत, दिलीप घाटे, किरण बरबटे, नरहरी कोपरकर, राकेश राऊत, चिंटू सोमनाथे, कल्पना बिसने, राधा कोपरकर, लता सोमनाथे, किरण राऊत, सुषमा कोपरकर, मान्यवर महिला हटवार यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक मंडळी उपस्थित होती. हर हर महादेवच्या जयघोषात व भजन-कीर्तनात संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले होते. चाचेर ते धापेवाडा या यात्रेत भाविकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

आमगावच्या मंडईतून दुचाकीची चोरी

दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव

तालुक्यातील ठाणा येथे भरलेल्या मंडईत खरेदीसाठी गेलेल्या मोटारसायकल मालकाची मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. जिल्हा परिषद शाळेच्या प्रवेशद्वारासमोर उभी केलेली सुमारे २५ हजार रुपये किमतीची हिरो कंपनीची एचएफ डिलक्स मोटारसायकल क्रमांक एम एच ३५ एपी ५९६१ मोटारसायकल चोरीला गेल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणातील फिर्यादी सरोज रमेश कावडे (वय ३२, रा. ठाणा, ता. आमगाव, जि. गोंदिया) या २५ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ठाणा येथे आयोजित मंडई पाहण्यासाठी गेले होते. त्यांनी आपली हिरो कंपनीची एचएफ डिलक्स मोटारसायकल जिल्हा परिषद शाळेच्या प्रवेशद्वारासमोर उभी केली होती. त्यानंतर त्या मंडई पाहण्यासाठी गेल्या. मंडई पाहून परत आल्यानंतर त्यांनी उभी केलेली मोटारसायकल त्या ठिकाणी दिसून आली नाही. त्यांनी परिसरात तसेच इतर ठिकाणी मोटारसायकलचा शोध घेतला; मात्र ती मिळून आली नाही. अखेर अज्ञात चोरट्याने मोटारसायकल चोरून नेल्याची खात्री झाल्यानंतर त्यांनी आमगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.



या तक्रारीवरून आमगाव पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा क्रमांक ६५२/२०२६, भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३(२) अन्वये चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. चोरीस गेलेल्या मोटारसायकलची अंदाजे किंमत २५ हजार रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास आमगाव पोलीस करीत असून, मंडईसारख्या गर्दीच्या ठिकाणी वाहनधारकांनी आपली वाहने सुरक्षित ठिकाणी उभी करून योग्य ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

जाम नदी पुलाजवळ संत्र्याचा ट्रक पलटी, २४ टन मालाचे मोठे नुकसान!

धोकादायक वळणावर गतिरोधकांचा अभाव; चालक किरकोळ जखमी, भारसिंगीकरांचा प्रशासनाला सवाल, मोठी दुर्घटना घडण्याची प्रतीक्षा आहे काय?

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

नरखेड तालुक्यातील भारसिंगी परिसरातील जाम नदी पुलाजवळील धोकादायक वळणावर गुरुवारी (२७ नोव्हेंबर) पहाटे साडेपाच वाजताच्या सुमारास संत्राने भरलेला १४ चाकी मालवाहू ट्रक पलटी झाल्याची घटना घडली. या अपघातात ट्रकमधील सुमारे २४ टन संत्राचा मालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, चालक अमित नंदकिशोर यादव (वय २३, रा. गमठा, जिल्हा नवादा) हा किरकोळ जखमी झाला आहे. त्याला तातडीने जलालखेडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले. सुदैवाने या अपघातात जीवितहानी झाली नाही. मात्र, या घटनेने भारसिंगी परिसरातील रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ट्रक क्रमांक WB 11 F 3039 हा वरूड येथून २४ टन संत्री घेऊन कोलकाता (पश्चिम बंगाल) येथे जात होता. ट्रकचे मालक इस्ताक अहमद हे कोलकाता येथील रहिवासी आहेत. भारसिंगीजवळील जाम नदी पुलाच्या उतारानंतर येणाऱ्या तीव्र वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि भरधाव ट्रक रस्त्यावर पलटी झाला. या अपघातात



ट्रकमधील संत्र्याच्या मालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यामुळे संत्रा उत्पादक शेतकरी अमोल फुटाणे यांना आर्थिक फटका बसला आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. या प्रकरणाचा तपास जलालखेडा पोलीस स्टेशनचे कर्मचारी सुनीता साठोणे व रवींद्र कांबळे करीत आहेत.

उतारानंतर तीव्र वळण; गतिरोधक नसल्याने अपघातांना निमंत्रण!

भारसिंगी परिसरातील जाम नदी पुलाजवळील वळण वाहनचालकांसाठी धोकादायक ठरत आहे. या ठिकाणी आधी रस्त्याचा उतार असून त्यानंतर लगेचच तीव्र वळण येते. त्यामुळे उतारावरून वेगाने येणाऱ्या वाहनांना अचानक वेग कमी करणे कठीण जाते. विशेषतः अवजड मालवाहू वाहनांसाठी हे वळण अधिक धोकादायक ठरत आहे. या ठिकाणी गतिरोधक, वेगमर्यादा दर्शविणारे फलक, धोक्याचे सूचनाफलक तसेच आवश्यक दिशादर्शक उपाययोजनांचा अभाव असल्याने अपघाताचा धोका कायम आहे.

या मार्गावरून दिवसरात्र अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. संत्रा वाहतूक करणारे ट्रक, प्रवासी वाहने, एसटी बस आणि इतर मालवाहू वाहनांची सतत वर्दळ असते. अशा परिस्थितीत रस्त्याच्या रचनेनुसार आवश्यक सुरक्षा उपाययोजना न केल्यास भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची भीती नागरिक व्यक्त करीत आहेत.

भारसिंगीच्या मुख्य चौकातही अपघातांचा सापळा!

केवळ जाम नदी पुलाजवळील वळणच नव्हे, तर भारसिंगीच्या मुख्य चौकातील वाहतूक सुरक्षेचाही प्रश्न गंभीर बनला आहे. भारसिंगी हे परिसरातील ३० ते ४० गावांना जोडणारे प्रमुख गाव असून, बाजारपेठेचे केंद्र म्हणूनही त्याचे महत्त्व आहे. येथून काटोल-नागपूर, वरूड-अमरावती, लोहारी सावंगा-कारंजा तसेच भिष्णूर-नरखेड या मार्गांवर मोठ्या प्रमाणात वाहनांची ये-जा सुरू असते.

गुरुवारी गावात आठवडी बाजार भरत असल्याने परिसरातील नागरिकांची मोठी गर्दी होते. तसेच गावात दोन महाविद्यालये असल्यामुळे विद्यार्थ्यांचीही सतत वर्दळ असते. बसची प्रतीक्षा करणारे विद्यार्थी, बाजारासाठी आलेले नागरिक, पादचारी आणि भरधाव वाहने यामुळे मुख्य चौकात अपघाताची शक्यता कायम असते. काही दिवसांपूर्वी याच चौकात शिवशाही बस आणि कार यांच्यात अपघात होऊन दोन्ही वाहनांचे नुकसान झाले होते. त्यामुळे मुख्य चौकातही गतिरोधक आणि इतर वाहतूक सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

ग्रामसभेत ठराव, प्रशासनाकडे पाठपुरावा; तरीही गतिरोधकांचा प्रश्न प्रलंबित!

भारसिंगीच्या मुख्य चौकातील अपघातांचा धोका लक्षात घेऊन ग्रामपंचायतीच्या मासिक सभा तसेच ग्रामसभेत गतिरोधक बसविण्याबाबत अनेकदा ठराव घेण्यात आले आहेत. संबंधित प्रशासनाकडे वारंवार मागणी व पाठपुरावाही करण्यात आला. मात्र, अद्याप प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याची खंत ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.

विशेष म्हणजे, जाम नदी पुलाजवळील वळणावर झालेला ताजा अपघात हा प्रशासनाशी धोक्याची घंटा मानला जात आहे. अपघात झाल्यानंतर केवळ पंचनामा आणि नुकसानभरपाईपुरती कारवाई न करता अपघात होऊ नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे. संबंधित बांधकाम विभाग आणि रस्ते प्रशासनाने दोन्ही ठिकाणांची पाहणी करून गतिरोधक, वेगमर्यादा फलक, रिफ्लेक्टर, दिशादर्शक फलक तसेच आवश्यक ठिकाणी रस्त्याचा सुरक्षेची कामे तातडीने करावीत, अशी मागणी जोर धरत आहे.

मोठी जीवितहानी झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?

संत्राचा ट्रक पलटी होऊन मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले; मात्र सुदैवाने चालकाचा जीव वाचला. आज मालाचे नुकसान झाले, उद्या एखाद्या प्रवासी बसचा किंवा शालेय विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या वाहनाचा अपघात झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल आता भारसिंगी परिसरातील नागरिक उपस्थित करीत आहेत. अपघात घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा अपघात टाळण्यासाठी आधीच पावले उचलणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधित विभागाने नागरिकांच्या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

"भारसिंगीच्या मुख्य चौकासह जाम नदी पुलाजवळील वळणावर वारंवार अपघात होत आहेत. या ठिकाणी रस्त्याला उतार आणि धोकादायक वळण असल्याने वाहनांचा वेग नियंत्रित होणे आवश्यक आहे. गतिरोधक बसविण्याबाबत ग्रामपंचायतीच्या मासिक सभा व ग्रामसभेत अनेकदा ठराव घेऊन संबंधित प्रशासनाकडे मागणी केली आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. आज झालेला ट्रकचा अपघात ही गंभीर बाब असून, एखाद्याचा जीव जाण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने दखल घेऊन मुख्य चौकासह जाम नदी पुलाजवळील वळणावर गतिरोधक बसवावेत."

– शारदा धवराळ, सरपंच, ग्रामपंचायत भारसिंगी

"काटोल-वरूडला जोडणारा हा मुख्य मार्ग असून वाहनांचा वेग अधिक असतो. त्यामुळे येथे मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी मुख्य चौकात गतिरोधक बसविणे आवश्यक आहे."

– ग्रामस्थ, भारसिंगी

अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर मनपा ॲक्शन मोडवर

मनपाद्वारे अवैध बॅनर्स, पोस्टर्स, कटआउट्सवर धडक कारवाई, अवैध जाहिरात फलक न हटवल्यास एफआयआर

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

शहरातील सार्वजनिक मालमत्ता, रस्ते, पदपथ तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या अनधिकृत जाहिरात फलक, बॅनर्स, पोस्टर्स, कटआउट्स, झेंडे, स्वागत कमानी आणि अन्य जाहिरात साहित्याविरोधात महानगरपालिकेद्वारे कठोर कारवाई करण्यात येत आहे. मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. उपराजधानीत येत्या ७ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनापूर्वी अवैध होर्डिंग्जविरोधात धडक कारवाई करण्याची अपेक्षा मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी समाज माध्यमांवर व्यक्त केली होती. याच अनुषंगाने नागपूर महानगरपालिका धरमपेठ





महानगरपालिकेच्या मा.महापौर श्रीमती निता ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मनपा आयुक्त डॉ. विपिन यांच्या नेतृत्वात अवैध होर्डिंग्जविरोधात धडक कारवाई केली जात आहे. त्या अनुषंगाने शनिवारी (ता. २८) नागपूर महानगरपालिका आणि नागपूर पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने दहाही झोनमध्ये अवैध होर्डिंग्जविरोधात धडक कारवाई करण्यात आली.

नागपूर महानगरपालिका धरमपेठ झोन अंतर्गत शहराचे विद्रूपीकरण रोखण्यासाठी आणि स्वच्छता राखण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या (मनपा) धरमपेठ झोन क्रमांक ०२ च्या वतीने अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स आणि होर्डिंग्ज हटवण्याची विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत झोनच्या पथकाने मुख्य रस्ते, चौक आणि विद्युत खांबांवरील एकूण १८० झेंडे व २३ छोटे बॅनर बेकायदेशीर फलक जप्त केले आहेत. महापालिका प्रशासनातर्फे सक्त इशारा देण्यात येतो की, यापुढे पूर्वपरवानगीशिवाय अनधिकृत पोस्टर किंवा बॅनर लावणाऱ्या व्यक्ती, संस्था अथवा जाहिरातदारांविरोधात थेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येईल.

नागरिकांनी व जाहिरातदारांनी केवळ मनपाने अधिकृत केलेल्या ठिकाणीच रीतसर परवानगी घेऊन जाहिराती लावाव्यात. शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे आणि बेकायदेशीर फलकांबाबत झोन कार्यालयात किंवा मनपाच्या अधिकृत पोर्टलवर तक्रार नोंदवावी, असे आवाहन धरमपेठ झोन प्रशासनाने केले आहे. अतिक्रमण निर्मुलन कारवाई मधे धरमपेठ झोन चे सहाय्यक आयुक्त राजकुमार मेश्राम, अतिक्रमण पथक धरमपेठ झोन, व कर्मचारी संपूर्ण कार्यवाहीमध्ये उपस्थित होते.

भोई समाज उपवर वधू परिचय मेळाव्याचे आयोजन आज

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

भोई ढिवर समाज कल्याणकारी बहुउद्देशीय संस्था, नागपूर, भोई विद्यार्थी संघटना नागपूर तथा भोई समाज महिला बहुउद्देशिय संस्था, नागपूर यांच्या सेंयुक्त विद्यमाने भोई-ढिवर-केवट-कहार व तत्सम समाज उपवर-वधु परिचय मेळावा गुणवंत विद्यार्थी व सेवानिवृत्त कर्मचारी व समाजरत्नांचा सत्कार सोहळा कार्यक्रमाचे आयोजन २९ नोव्हेंबर २०२६ ला श्री संत रवीदास सभागृह हनुमान नगर नागपूर येथे करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटक चंद्रलाल मेश्राम, माजी न्यायाधीश, माजी सदस्य राज्य मागासवर्ग आयोग, संचालक मच्छिमार संघ, मुंबई व नागपूर यांच्या हस्ते तर मा. प्रकाश डायरे अध्यक्ष भोई ढिवर समाज कल्याणकारी बहु. संस्था नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली होईल. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी सदाशिवराव वलथरे माजी उपाध्यक्ष, भंडारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक प्रमुख पाहुणे कृष्णा नागपूरे, अध्यक्ष चंद्रपूर जिल्हा भोई समाज सेवा संघ, चंद्रपूर प्रमिलाताई गौर, नगरसेविका, नागपूर म.न.पा. मनोहर पचारे, महासचिव विदर्भ भोई समाज सेवा संघ, वर्धा कमलेश सौंदीया, अध्यक्ष कहार समाज उत्कर्ष संस्था, नागपूर राजेश डहारे, माजी प्राचार्य, सर्वोदय महाविद्यालय शिदेवाही, चंद्रपूर मनोहर भोयर अध्यक्ष भारतीय भोई विकास मंडळ, नागपूर सुरेशराव शिवरकर, अध्यक्ष आदिवासी दिवर संस्था, नागपूर सुलोचनाताई नान्हे, जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, नागपूर मा. दिलीप मेश्राम, महासचिव भा.भो.म. अध्यक्ष जिवन रक्षक दल, म.रा. मा. राजुभाऊ वलथरे, संचालक, विदर्भ विभागीय मच्छिमार संघ, नागपूर सुनिल बावणे, संचालक विदर्भ विभागीय मच्छिमार संघ, नागपूर गजेंद्र चाचेरकर, अध्यक्ष दादा इन्टरनॅशनल नागपूर भाग्यवान मेश्राम, अध्यक्ष भोई समाज संस्था, गडचिरोली. आदी मान्यवरांची उपस्थिती राहनार आहे.

'पंचलेट' नाटकाने पटकावला प्रथम क्रमांक

२१व्या एकांकिका बहुभाषी नाट्य महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

कला सागरच्या वतीने आणि विदर्भ हिंदी साहित्य सम्मेलनाच्या सहकार्याने आयोजित २१व्या एकांकिका बहुभाषी नाट्य महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा शुक्रवारी उत्साहात पार पडला. विदर्भ राष्ट्रभाषा प्रचार समिती नागपूर प्रस्तुत पंचलेट या नाटकाने प्रथम क्रमांक पटकावला. देवराव कुबडे सेवा प्रतिष्ठान नागपूर प्रस्तुत ओमेगा-बियॉन्ड ह्यूमन या नाटकाला द्वितीय, सिंधी काउन्सिल ऑफ इंडिया खामला नागपूर प्रस्तुत हँसियु मायू बिमार पुळन या नाटकाला तृतीय पुरस्कार मिळाला.



पारितोषिक वितरण सोहळ्याला सेवानिवृत्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एवं लोकपाल नागपूर विद्यापीठ शरद त्रिवेदी, सेवानिवृत्त अतिरिक्त आयुक्त महानगरपालिका नागपूर हेमंत पवार, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल सदस्य चंद्रशेखर गिल्लुरकर, चार्टर्ड अकाउंटंट शाम लोहकरे, सांस्कृतिक आघाडी नागपूर अभय देशमुख यांच्यासह कला सागरचे मुख्य संरक्षक व सचिव पदम नायर, अध्यक्ष रविशेखर गिल्लूरकर, कार्याध्यक्ष सुशील तिवारी, उपाध्यक्ष रवींद्र बिजवे, कोषाध्यक्ष डॉ. रमेश बारस्कर, सहसचिव रुपाली वंजारी, सविता पांडे, अरविंद लोंढे, प्रवीण एम., गौरी बोकाडे, रिटा धनवटे, सुरेश सांगोलेकर आणि संदीप डोंगरे उपस्थित होते. यावेळी नृत्य आणि संगीताचा कार्यक्रम झाला. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. परीक्षक म्हणून अपर्णा लखमापुरे, रमेश लखमापुरे आणि शक्ती रतन यांनी काम पाहिले.

असे आहेत पारितोषिक विजेते

सर्वोत्कृष्ट अभिनय (पुरुष)
प्रथम : इस्सानियत गिर गयी है, नाटकासाठी सुरेश सांगोलकर
द्वितीय : पंचलेटसाठी हर्षित कुमार
तृतीय : ओमेगासाठी शार्दुल मोहरिल
सर्वोत्कृष्ट अभिनय (महिला)
प्रथम : ओमेगा नाटकासाठी भावना चौधरी
द्वितीय : हँसियु मायू बिमार पुळनसाठी वर्षा नारायणी
तृतीय : एक फूल तीन माली साठी श्रद्धा गुमगांवकर
उत्कृष्ट बालकलाकार : देर आयद, दुरुस्त आयदसाठी सुहानी मंगलानी
उत्कृष्ट हास्यकलाकार
पुरुष गटात : एक फूल तीन माली नाटकासाठी किशोर वाजूरकर
महिला गटात : पंचलेट या नाटकासाठी अत्पना गुप्ता
सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक
प्रथम : : पंचलेटसाठी मयूर माणकर
द्वितीय : ओमेगासाठी भावना चौधरी
तृतीय : हँसियु मायू बिमार पुळनसाठी किशोर लालवाणी
उत्कृष्ट रंगमंच सजावट: ओमेगासाठी दर्शना माणकर
उत्कृष्ट प्रकाशव्यवस्था: पंचलेटसाठी अक्षय खोब्रागडे
उत्कृष्ट संगीत: द लास्ट वर्किंग डे साठी अमित कुबडे
उत्कृष्ट रंगभूषा: पंचलेटसाठी निकिता ठाकूरकर
उत्कृष्ट लेखन: ओमेगासाठी चंद्रकांत चौधरी

थोडक्यात

महात्मा फुले यांच्या विचारांनी समाज जागृतीची गरज



दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड

साने गुरुजी ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या वतीने क्रांतीज्योती महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी मंडळाचे अध्यक्ष सुरेश झुरमुरे यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्त्या विनाताई पवार यांनी महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकला. महात्मा फुले यांनी समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता दूर करण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाचा त्यांनी दिलेला संदेश आजही तितकाच प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

मंडळाचे अध्यक्ष सुरेश झुरमुरे यांनी आपल्या भाषणातून महात्मा फुले यांनी सर्व समाजघटकांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी अनेक शाळा स्थापन करून समाजजागृतीचे कार्य केले, असे सांगितले. त्यांच्या विचारांचा अंगीकार करून सामाजिक समता व शिक्षणाचा प्रसार करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचालन सचिव दादूजी गोखले यांनी केले. आभार उपाध्यक्ष मधुकर फुकट यांनी मानले. यावेळी शरद व्यवहारे, राम तांबडे, रामू धोटे, मनोहर तोंडे, स्मिता देशमुख, गंगाधर काटवले, कृष्णा हेडाऊ, काशिनाथ घुगुसकर, सुरेश आंबोने, भगवान देशमुख, प्रकाश वाघमारे, माधव वैद्य, अरुण बोडें यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संविधानाचे महत्त्व प्रत्येक नागरिकाने जाणून घेणे गरजेचे



दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड

साने गुरुजी ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या वतीने संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मंडळाचे अध्यक्ष सुरेश झुरमुरे यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर साने गुरुजी ज्येष्ठ नागरिक सभागृहात आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते केशवराव डेंगे यांनी भारतीय संविधानाची निर्मिती, संविधानातील मूलभूत तत्त्वे, नागरिकांचे हक्क व कर्तव्ये तसेच लोकशाही व्यवस्थेतील संविधानाचे महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष सुरेश झुरमुरे होते. अध्यक्षीय भाषणातून त्यांनी संविधान हे देशाच्या लोकशाही व्यवस्थेचा आधारस्तंभ असून प्रत्येक नागरिकाने संविधानाची मूल्ये समजून घेऊन त्यांचा दैनंदिन जीवनात अंगीकार करावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन रामू तांबडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन राजू नाईक यांनी केले.यावेळी गंगाधर कटवले, माधव वैद्य, मोहन कडू, बंडू शिंदे, वीणा पवार, क्षीरसागर, बोरकर यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धोंडाबाई बाबुराव आवळे यांचे निधन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : बोखारा गाव येथील रहिवासी बुद्धवासी धोंडाबाई बाबुराव आवळे (वय ८५) यांचे दुःखद निधन झाले. त्या वरिष्ठ समाजसेवक विजयपाल बाबुरावजी आवळे यांच्या मातोश्री होत्या. त्यांच्या निधनाने आवळे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळ्ला असून परिसरात शोक व्यक्त केला जात आहे. त्यांची अंत्ययात्रा रविवार २९ नोव्हेंबर रोजी दुपारी २.३० वाजता त्यांच्या राहत्या घरून, बोखारा गाव येथून निघणार आहे.

मदर डेअरीच्या माध्यामातून ५० लाख लिटर दूध संकलनाचा संकल्पी : नितीन गडकरी

'अॅग्रोव्हिजन २०२६'





दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

विदर्भातील दुग्धव्यवसायाला चालना देण्यासाठी 'मदर डेअरी'ला निमंत्रित करण्याचा निर्णय घेतल्याचा सकारात्मक परिणाम आज दिसत आहे. पूर्वी विदर्भात सरकारी आणि सहकारी दूध योजना बंद असताना शेतकऱ्यांना दुधासाठी प्रतिलिटर २० ते २५ रुपये अधिक दर मिळू लागला आहे, असे सांगताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले, मदर डेअरीच्यान माध्यमातून सुरुवातीला दररोज १० लाख लिटर दूध संकलनाचे ठेवलेले उद्दिष्ट जवळपास पूर्ण झाले असून, आता हे संकलन ५० लाख लिटरपर्यंत नेण्याचा संकल्प करण्यात आला आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मैदानावर सुरू असलेल्याध 'अॅग्रोव्हिजन २०२६' प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशी 'दुष्काळी परिस्थितीतीत पशुसंवर्धन आणि चारा नियोजन' या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत ते बोलत होते. या कार्यशाळेला दुध उत्पादक महिलांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. यावेळी यावेळी उत्कृष्ट दूध उत्पा दक सभासद विजेत्याद आणि मराठव-हाड दूधसम्राज्ञींचा सत्कीर करण्यावत आला.

मेळघाटातील कुपोषण आणि गरिबीची समस्या दूर करण्यासाठी दुग्धव्यवसायाला प्रोत्साहन देण्यावर विशेष भर दिला जात आहे. तेथे दूध संकलन वाढवून पुढील दोन वर्षांत दररोज १० हजार लिटर दूध संकलनाचे उद्दिष्ट गाठण्याचे नियोजन आहे. तसेच पुढील तीन वर्षांत दरवर्षी एक कोटी रुपयांचे दूध विक्री करणाऱ्या १०० महिला उद्योजिका तयार करण्याचा मानस असल्याचे गडकरी यांनी सांगितले.

विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी दुग्धोत्पादन, कृषी प्रक्रिया उद्योग आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे आवश्यक आहे. या माध्यमातून शेतीचा उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढवता येईल आणि शेतकऱ्यांना कर्जमुक्त व समृद्ध बनवता येईल, असा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.

स्व.त.वर विश्वास ठेवा - डेअरी उद्योजिका श्रद्धा धवनढो रमले

बारा वर्षापासून दुध व्यवसाय करत असलेल्यां डेअरी उद्योजिका श्रद्धा धवन ढोरमले यांनी यशोगाथा सांगितली. दोन म्ह शीपासून सुरू केलेला हा व्यवसाय आता ८० म्हसणी असून दोन मजली गोठा आहे. सोबतच बायोगॅसपासून वीज निर्मिती प्रकल्पा, गांडळूखत प्रकल्प देखील सुरू केला आहे. ग्रामीण भागातील तरुणींनी कोणतेही काम कमी न लेखता स्वतःवर विश्वास ठेवून पुढे जावे, असे आवाहनही श्रद्धा धवन यांनी केले.

बुटीबोरीमध्येत उभारणार पशुखाद्य प्रकल्प

बुटीबोरी येथे ५०० एकर क्षेत्रावर पशुखाद्य प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे. नागपुरात दुग्धजन्य पदार्थ, संत्रा बर्फी आणि 'धारा' तेलाच्या उत्पादन प्रकल्पांनाही चालना दिली जात आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध होण्यावरोबरच स्थानिक स्तरावर रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असे त्यांनी नमूद केले.

नागपूरच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर संत्रा बर्फीसाठी विशेष स्टॉल उभारण्यात येणार आहे. दर्जेदार संत्र्यांची देशातील प्रमुख सुपरमार्केटमध्ये विक्री करण्याचे नियोजन असून, आकाराने लहान असलेल्या संत्र्यांपासून ज्यूस निर्मिती केली जाणार आहे. संत्र्याचे मूल्यवर्धन करून उत्पादकांना अधिक उत्पन्न मिळवून देण्याचा यामागील उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शेतीचा खर्च कमी करून उत्पादकता वाढवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), सॅटेलाइट आणि ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर सुरू झाला आहे. या तंत्रज्ञानामुळे पाणी, खते आणि कीटकनाशकांच्या वापरात ५० टक्क्यांपर्यंत बचत होत असल्याचे गडकरी यांनी सांगितले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास शेती अधिक किफायतशीर आणि फायदेशीर होऊ शकते, असेही ते म्हणाले. याशिवाय विदर्भात १०० बायोगॅस प्रकल्प उभारण्याची योजना असून, इथेनॉल आणि कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी)वर चालणाऱ्या ट्रॅक्टरचे लोकार्पण करण्यात येणार आहे. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी पहिल्या टप्पात एक हजार शेतकऱ्यांसाठी परवडणाऱ्या दरात 'स्मार्ट व्हिलेज' उभारण्याची घोषणाही गडकरी यांनी केली.

दुग्धव्यवसाय, कृषी प्रक्रिया, कृषी उत्पादनांचे मूल्यवर्धन आणि आधुनिक तंत्रज्ञान यांची सांगड घातल्यास विदर्भातील शेतीला नवी दिशा मिळू शकते. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी या क्षेत्रांमध्ये एकत्रित प्रयत्नांची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

नितीन गडकरीः विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी दुग्धोत्पादन, कृषी प्रक्रिया उद्योग आणि आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरणे आवश्यक असून, यातूनच शेतकरी कर्जमुक्त व समृद्ध होईल, असा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी 'अॅग्रोव्हिजन'मधील भाषणात व्यक्त केला.

पूर्वी विदर्भात सरकारी व सहकारी दूध योजना बंद असताना 'मदर डेअरी'ला निमंत्रित केल्यामुळे आज शेतकऱ्यांना दुधाला प्रतिलिटर २० ते २५ रुपये अधिक दर मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. सुरुवातीला १० लाख लिटर दूध संकलनाचे उद्दिष्ट जवळपास पूर्ण झाले असून, आता ते ५० लाख लिटरपर्यंत नेण्याचा संकल्प आहे; तसेच बुटीबोरी येथे ५०० एकरवर पशुखाद्य प्रकल्प आणि नागपुरात दुग्धजन्य पदार्थ, संत्रा बर्फी व 'धारा' तेलाच्या प्रकल्पांना चालना दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

मेळघाटातील कुपोषण आणि गरिबी दूर करण्यासाठी तेथे दूध संकलन वाढवून दोन वर्षांत १० हजार लिटरचे उद्दिष्ट गाठण्यावर भर दिला जात असून, पुढील तीन वर्षांत वर्षाला १ कोटी रुपयांचे दूध विकणाऱ्या १०० महिला तयार करण्याचा मानस गडकरी यांनी बोलून दाखवला. याशिवाय, नागपूरच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर संत्रा बर्फीसाठी विशेष स्टॉल, चांगल्या संत्र्यांची देशातील सुपरमार्केटमध्ये विक्री, तर लहान संत्र्यांपासून ज्यूस निर्मिती केली जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शेतीतील खर्च कमी करून उत्पन्न वाढवण्यासाठी 'एआय', सॅटेलाइट आणि ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर सुरू झाला असून, त्यातून पाणी, खते आणि औषधांमध्ये ५० टक्के बचत होत असल्याचे त्यांनी सांगितले. विदर्भात १०० बायोगॅस प्रकल्प, इथेनॉल व सीबीजीवर चालणाऱ्या ट्रॅक्टरचे लोकार्पण तसेच पहिल्या टप्पात १,००० शेतकऱ्यांसाठी परवडणाऱ्या दरात 'स्मार्ट व्हिलेज' उभारण्याची घोषणाही गडकरी यांनी यावेळी केली.

समर्थ रामदास विद्यालयात दैनिक सिंहवाणी वृत्तच्या 'दीपरंग २०२६' दिवाळी अंकाचे वितरण



दै. सिंहवाणी वृत्त : समर्थ रामदास हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, अरोली, ता. मौदा, जि. नागपूर येथे दैनिक सिंहवाणी वृत्तच्या 'दीपरंग २०२६' या दिवाळी अंकाचे व दैनिक सिंहवाणी वृत्तच्या विशेष अंकाचे वितरण करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील बडवाईक, पर्यवेक्षक केशव डोकरीमारे, महेश लिचडे, संजय पुरी, नितीन उईके, अश्विन कुंभलकर, प्रविण मोहनकार, विक्की पडोळे, प्रा. किरण धुर्वे, प्रा. नेहा गभणे व आरती कारामोरे यांना दैनिक सिंहवाणीचा अंक शनिवार २८ नोव्हेंबर ला भेट देण्यात आला. याप्रसंगी काचुरवाही येथील दैनिक सिंहवाणी वृत्तचे प्रतिनिधी शुभम कामळे उपस्थित होते.

गोंदिया जिल्ह्यात बोअरवेल खोदकामांवर पुढील आदेशापर्यंत बंदी

घरगुती पाणी वापरासाठीचे बोअरवेल व जुने बोअर फ्लश करण्यास सूट; आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई



दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया

जिल्ह्यात अपुरे पर्जन्यमान आणि जलाशयांमधील कमी पाणीसाठ्यामुळे संभाव्य पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेता, भूजल स्रोतांचे संरक्षण करण्यासाठी संपूर्ण गोंदिया जिल्ह्यात नवीन बोअरवेल खोदकामे तसेच विद्यमान बोअरवेल अधिक खोल करण्याच्या कामांवर पुढील आदेशापर्यंत बंदी घालण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष मंदार पत्की यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अंतर्गत हा आदेश जारी केला आहे.

जिल्ह्यातील गोंदिया, तिरोडा, गोरेगाव, आमगाव, सालेकसा, देवरी, अर्जुनी मोरगाव आणि सडक अर्जुनी या सर्व आठही तालुक्यांमध्ये ही बंदी लागू राहणार आहे. खासगी व्यक्ती, शेतमालक, गृहनिर्माण संस्था, बांधकाम व्यावसायिक, उद्योग, व्यावसायिक आस्थापना तसेच बोअरवेल खोदकाम करणारे कंत्राटदार व रिगमालक यांना हे निर्बंध लागू असतील. मात्र, शासकीय यंत्रणांमार्फत पाणीटंचाई निवारणासाठी आणि सार्वजनिक पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी करण्यात येणाऱ्या बोअरवेल खोदकामांना या बंदीतून सूट देण्यात आली आहे. तसेच घरगुती पाणी वापरासाठी बोअरवेल खोदकाम आणि जुन्या बोअरवेलचे फ्लशिंग करण्यासाठी स्वतंत्र परवानगीची आवश्यकता राहणार नाही.

बंदी लागू असलेली सुरू असलेली खोदकामे तात्काळ थांबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पोलीस विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी समन्वयाने आदेशाची अंमलबजावणी करावी. प्रतिबंधित खोदकाम सुरू असल्याचे आढळल्यास संबंधित काम थांबवून जबाबदार व्यक्तींविरुद्ध आपत्ती व्यवस्थापन अधिनियमातील तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. सर्व तहसीलदार व स्थानिक स्वराज्य संस्थांनी आदेशाच्या प्रसिद्धीचा आणि अंमलबजावणीचा प्रारंभिक अहवाल तीन दिवसांत सादर करावा, तसेच त्यानंतर साप्ताहिक अहवाल देण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी मंदार पत्की यांनी दिले आहेत. हा आदेश पुढील आदेशापर्यंत लागू राहणार असून, विद्यमान बोअरवेलचा वापर बंद करण्याचे निर्देश देण्यात आलेले नाहीत.

पार्वती अर्बनच्या महिला वसुली एजंटला अटक

अंदाजे तीन लाख रुपयांचा कथित अपहार

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

शहरातील सावनेर येथील पार्वती अर्बन सहकारी संस्थेच्या एका महिला एजंटने अंदाजे तीन लाख रुपयांचा अपहार केल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे.

गोंदिया जिल्ह्यातील कुंभारे नगर, गौतम बुद्ध वॉर्ड येथील एक तरुणी गेल्या सात महिन्यांपासून सावनेर येथील पार्वती अर्बन सहकारी संस्थेत वसुली एजंट म्हणून काम करत होती. सुरुवातीला, तिने निष्ठेने आणि चांगल्या प्रकारे काम करून संस्थेचे प्रशासक आणि संचालकांचा विश्वास संपादन केला होता. तथापि, गेल्या तीन महिन्यांत तिच्या कामाच्या पद्धतीत आणि आर्थिक वर्तनात लक्षणीय बदल दिसून आले. संस्थेच्या संस्थापकाने तिच्या वसुलीवर लक्ष ठेवण्यास सुरुवात केली. असे आढळून आले की, तिने अंदाजे ६७ खातेदारांकडून गोळा केलेले सुमारे ८०,००० रुपये संस्थेत जमा केले नव्हते. यामुळे संशय निर्माण झाला.

पार्वती अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे प्रशासक अजय पद्माकर व्यवहारे यांनी सर्व खातेदारांना त्यांच्या पासबुकसह संस्थेच्या कार्यालयात बोलावण्यात आले. यातून सुमारे ८१ खातेदारांच्या आर्थिक गैरव्यवहाराचा पर्दाफाश झाला, ज्यात त्यांच्याकडून गोळा केलेले २८,००० रुपये आणि ३,०७,८०० रुपयांच्या कमिशनचा समावेश होता.

हे प्रकरण एका प्रतिष्ठित संस्थेशी आणि एका महिलेशी संबंधित असल्याने, संस्थेचे संचालक आणि प्रशासकांनी त्या महिला एजंटला कार्यालयात बोलावून गोळा केलेल्या रकमेबद्दल मानवी व संवेदना बाळगत चौकशी केली.असता ती समाधानकारक उत्तर देऊ शकली नाही. तिच्या ग्राहकांनी हप्ते भरले नसल्याचा दावा करून तिने विषय टाळला आणि 'उद्या चर्चा करू' असे सांगून ती निघून गेली.



तीचाच डाव तिच्यावरच उलटला

पार्वती अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या महिला एजंटने नागपूर येथील पोलीस अधीक्षकांच्या कार्यालयात जाऊन तोंडी तक्रार दाखल केली, त्यानंतर नागपूर ग्रामीणच्या पोलीस अधीक्षकांनी सावनेर पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्याला योग्य तपास करण्याचे आदेश दिले. परिणामी, सावनेर पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्याने त्या महिलेच्या प्रकरणाचा तपास करण्याचे निर्देश दिले. पार्वती अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे एजंट, व्यवस्थापक आणि संचालक यांना पोलीस ठाण्यात बोलावून तपास करण्यात आला. ज्यामध्ये पार्वती अर्बन संस्थेने आपली बाजू मांडली आणि वर नमूद केलेल्या सर्व खातेदारांशी बोलल्यानंतर असे उघड झाले की, सदर महिला एजंटने स्वतःच अपहार केला होता. तसेच, तिने संस्थेचे प्रशासक आणि संचालकांवर केलेले आरोप खोटे असल्याचे आढळून आले.

पार्वती अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे खाते व्यवस्थापक अजय पद्माकर व्यवहारे यांच्या लेखी तक्रारीवरून, सावनेर पोलिसांनी २०/११/२०२६ रोजी भारतीय दंड संहिता २०२३ च्या कलम ३१६ (५) अंतर्गत त्या महिला एजंटविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. त्यामुळे, २५ नोव्हेंबर रोजी त्या महिला एजंटला अटक करून सावनेर न्यायालयात हजर करण्यात आले असता तीली न्यायाधीशांनी न्यायालयीन कोठडी सुनवय जिल्हा महिला कारागृहात रवाना केले.

मा.पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार, मा.अतिरिक्त पोलीस अधिक्षक अनिल म्हस्के, सावनेर उपविभागीय पोलीस अधिकारी सागर खर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली सावनेर ठाणेदार यांच्या नेतृत्वाखाली पीएसआय बी.जी.राठोड पुढील तपास करत आहेत

थोडक्यात

रामटेक विधानसभा क्षेत्रातील दिव्यांग बांधवांना 'अलिमको'च्या माध्यमातून कृत्रिम पायांचे वितरण



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

आज 'स्नेह सदन बौद्धिक अक्षम मुला-मुलींची विशेष शाळा' येथील दिव्यांग सहायता कक्षाच्या वतीने रामटेक विधानसभा क्षेत्रातील गरजू दिव्यांग लाभार्थ्यांना 'अलिमको' संस्थेच्या माध्यमातून आधुनिक कृत्रिम पाय मिळवून देण्यात आले. या सर्व लाभार्थ्यांच्या प्रवासाची आणि ने-आण करण्याची संपूर्ण व्यवस्था माननीय राज्यमंत्री आशिषजी जयस्वाल यांच्या वतीने करण्यात आली होती. या उपक्रमामुळे अनेक गरजू लाभार्थ्यांना पुन्हा एकदा स्वावलंबी जीवन जगण्यासाठी मोठा आधार मिळाला आहे.

सावनेर येथे संविधान दिना निमित्त सामुहिक बुध्द वंदनेचे आयोजन



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी युवक जागृती मंडळाचे वतीने सावनेर बसस्थानका जवळील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णा कृती पुतळा येथे संविधान दिनाच्या पावण पर्वा निमित्त दिनांक २६ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता भाजप नेते रामराव मोवाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत भारत ल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुणार्कृती पुतळ्याची पुजा अर्चना माल्यार्पणा नंतर सामुहिक बुध्द वंदना घेण्यात आली यावेळी शिलरक्षीत महाथेरो भाजप जिल्हाध्यक्ष मनोहर कुंभारे, माजी नगराध्यक्ष अँड अरविंद लोधी युवक जागृती मंडळाचे अध्यक्ष सुधाकर बागडे,गटाचे नेते संजय काळभेघ प्रामुख्याने उपस्थित होते यावेळी संविधान दिनाचा विजय असो, जबतक सुरज चांद रहेगा बाबा तेरा नाम रहेगा अशी घोषवाक्य देण्यात आली कार्यक्रमाचे समापण मिठाई वाटपाने करण्यात आली कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्जनविस होमेश्वर डोंगरे, संचालन परमानंद मानवटकर तर आभारप्रदर्शन मंडळाचे सचिव विक्की शेंडे यांनी केले कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी सागर मेश्राम, राजेश बडखाने, स्तुप बागडे यांनी मोलाचे सहकार्य केले.

वाळूची अवैध वाहतूक केल्याप्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल, ७५ लाख ६० हजार रुपयांचा माल जप्त



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

तालुक्यातील खापा मौजा येथील हद्दितिल बिडचिचघाटमध्ये कान्हान नदीच्या काठावर जेसीबी मशीनच्या साहाय्याने बेकायदेशीरपणे वाळूचे उत्खनन करणाऱ्या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जेसीबी मशीनच्या साहाय्याने वाळूची अवैध तस्करी होत असल्याच्या माहितीच्या आधारे, एक जेसीबी मशीन, एक टाटा हायवा ट्रक आणि एक ट्रॅक्टर हे जेसीबी मशीनच्या साहाय्याने अवैधपणे वाळूची वाहतूक करत असल्याचे आढळून आले.

पोलिसानी नमुद घटनास्थळ जावुन पहाणी केली असता आरोपी जेसीबी चालक १) चोखेलाल बेनिश्याम पंचेश्वर, वय ४२ वर्षे, रा. खापरखेडा शिवनगर, ता. सावनेर जि. नागपूर, २) प्रमोद पन्ना खैरवार, वय ३४ वर्षे, रा. खापरखेडा वार्ड क्र.२.शिवनगर ता. सावनेर, जि. नागपूर हे घटनेचे ठिकाण आहे, मितुन आळे. ट्रक क्र. Tata Signa 3532 TK - MH-40/DC-5023 चा चालक ३) संकेत कोल्हे, रा. खंडाळा पारडी, ता. पारशिवनी, जि. नागपूर हे घटनास्थळ, पसार झाला. मालकी हक्काचे विचार ४) सुजित ठाकूर, रा. निंबा, ता. पारशिवनी, जि. अशी माहिती नागपूरला मिळाली. पोलिसांनी आरोपीच्या वाहनाची चौकशी सुरू केली.

पोलिसानी पंचसमाक्ष जेसीबी क्र. एमएच-४०/पी-३४६१, २०,००,००० रुपये किमतीचा एक टाटा सिग्ना ३५३२ टीके एसएल., एमएच-४०/डीसी-५०२३ मध्ये ५०,४०,००० रुपये किमतीच्या ४ पितळी सळ्या, ५,००,००० रुपये किमतीचा एक सोनालिका कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एमएच-३४/बीआर-९६५९, ७५,६०,००० रुपये किमतीचे २ अँड्रॉइड मोबाईल फोन, केली जप्त. नामुद आरोपीविरुद्ध भारतीय न्यायिक संहिता कलम ३०३ (२), ४९, ३ (५), भान्यसम, सहकालम, महाराष्ट्र भू-महसूल अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नियमांच्या कलम ४८ (७), (८), खाण खनिज अधिनियम कलम ४, कलम २१, सार्वजनिक मालमत्ता नुकसान अधिनियम कलम ३, पर्यावरण अधिनियम कलम १५ अंतर्गत इतर गुन्हे नोंदवण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

अतिक्रमण हटविण्यासाठी मनपाची कारवाई

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार नागपुरातील वाहतुकीला अडथळे निर्माण करणारे, दुकानांसमोर बेकायदेशीर शेड उभारलेले, फूटपाथवर अतिक्रमण करून पादचाऱ्यांना चालण्यासाठी अडचणी निर्माण करणारे तसेच शहरात ठिकठिकाणी अनधिकृतपणे फ्लेक्स लावणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची धडक कारवाई नागपूर महानगरपालिकेने सुरू केली आहे. दुकानासमोर सामासिक अंतरावर टीन शेड उभारणाऱ्यावरही कारवाई करावी, असे निर्देश मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी दिले.

युवा प्रतिभेचा सुरेल उत्सव; आकाशवाणीच्या 'रायझिंग स्टार्स'ने जिंकली रसिकांची मने !

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

युवा प्रतिभेला हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आकाशवाणी नागपूर केंद्राच्या वतीने आयोजित करण्यात आलेली 'AIR RISING STARS – SEASON 1 (2026)' ही विशेष युवा संगीत सभा शुक्रवार, दिनांक २७ नोव्हेंबर २०२६ रोजी धरमपेठ येथील वनामती सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

शास्त्रीय गायन, अभिजात वाद्यसंगीत, मराठी भावगीत आणि आधुनिक फ्युजन संगीताचा सुरेल संगम अनुभवण्याची संधी या कार्यक्रमाच्या माध्यमातून रसिकांना मिळाली. युवा कलाकारांच्या दमदार आणि दर्जेदार सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.



कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून संगीत सभेचे उद्घाटन करण्यात आले. आकाशवाणीचे कार्यालय प्रमुख जयसिंग गावडे यांनी स्वागतपर भाषण केले तर कार्यक्रम प्रमुख डॉ. विजयसिंह राजपूत यांनी प्रास्ताविक पर भाषणातून या कार्यक्रमाची नेमकी भूमिका विशद केली.यावेळी नागपूर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या अध्यक्षा श्रीमती शिवानी दाणी-वखरे तसेच सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि जीवनकौशल्य प्रशिक्षक डॉ. संजय रघटाटे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी मनोगत व्यक्त करताना शिवानी दाणी-वखरे यांनी आपल्या बालपणापासूनच आकाशवाणीशी आपला जिव्हाळ्याचा संबंध असल्याचे सांगितले. आकाशवाणीने अनेक वर्षांपासून संगीत, कला आणि संस्कृतीच्या संवर्धनात महत्त्वपूर्ण योगदान दिले असून, या माध्यमाशी असलेल्या आपल्या आठवणींना त्यांनी उजाळा दिला. डॉ. संजय रघटाटे यांनी आपल्या मनोगतात या अभिनव उपक्रमाची प्रशंसा केली. युवा पिढीतील सुप्त कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळणे ही काळाची गरज असून, अशा संधींमुळे नवोदित कलाकारांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांच्या कलागुणांना व्यापक ओळख मिळते, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात युवा गायक आनंद चिमोटे यांच्या शास्त्रीय गायनाने झाली. त्यानी राग भूप सादर करत शास्त्रीय गायनाची सुरेल मैफल रंगवली. विलंबित एकतालातील बंदिशीनंतर त्यांनी द्रुत तीनतालातील रचना प्रभावीपणे सादर केली.

त्यानंतर नाद विद्या अपरंपार या बंदिशीतून भारतीय शास्त्रीय संगीताचे महत्त्व अधोरेखित केले. त्यानंतर ऋषिकेश कमरकर यांनी आपल्या सुरेल दिलरुबा वादनातून राग बागेश्रीची प्रस्तुती केली. झपतालातील रचनेनंतर एकतालातील रचना सादर करून त्यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. सुगम गायिका तेजस्विनी खोडतकर यांनी आपल्या सुमधुर आवाजात मराठी भावगीतांची सुरेल मेजवानी सादर केली. त्यांच्या भावपूर्ण सादरीकरणाला रसिकांकडून विशेष दाद मिळाली.

कार्यक्रमाचा विशेष आकर्षणबिंदू ठरला तो युवा कलाकार शुभम चोपकर आणि संकेत माकोडे तसेच त्यांच्या सहकाऱ्यांचा बांसुरीवाला कलेक्टिव्ह म्युझिकल बँड. या बँडने भारतीय पारंपरिक संगीत आणि आधुनिक संगीतशैली यांचा अनोखा मिलाफ साधत फ्युजन संगीताचा जोशपूर्ण आविष्कार सादर केला. बासरीच्या सुरेल स्वरांसह विविध वाद्यांच्या तालबद्ध संगतीने सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. शास्त्रीय संगीतापासून आधुनिक फ्युजनपर्यंतचा हा संगीतप्रवास रसिकांसाठी विशेष आनंददायी ठरला.

या संपूर्ण संगीत सोहळ्याचे सूत्रसंचालन आकाशवाणीच्या युववाणी विभागातील निवेदिका स्वर्णिमा कमलवार, आक्षेषा भट, अश्विनी खवसे आणि रूपल गरीबे यांनी अत्यंत प्रभावी व उत्साही शैलीत केले. संगीत विभागाच्या कार्यक्रम अधिकारी मोनाली शेंडे यांच्या आभार प्रदर्शनाने या कार्यक्रमाची सांगता झाली. भारतीय संगीताच्या समृद्ध परंपरेचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासोबतच आधुनिक संगीताच्या विविध प्रवाहांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम नागपूरच्या सांस्कृतिक क्षेत्रातील एक उल्लेखनीय पर्व ठरला. कार्यक्रमाचे संपूर्ण ध्वनिमुद्रण करण्यात आले असून, या संगीत सभेचे संपादित ध्वनिमुद्रण मंगळवार, दिनांक १ डिसेंबर २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता आकाशवाणी नागपूरच्या 'अ' केंद्रावरून प्रसारित करण्यात येणार आहे सोबतच हा कार्यक्रम आकाशवाणी नागपूर केंद्राच्या अधिकृत युट्यूब चैनल वर देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

मूक बधिर निवासी शाळेत संविधान दिन उत्साहात

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर : मूक बधिर निवासी शाळा सावनेर येथे भारतीय संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मुंबईच्या माजी महापौर डॉ. शुभा राऊळ , उमेश राऊळ तसेच संस्थेचे सचिव नारायण समर्थ, प्र.मुख्याध्यापिका कविता केळापूरे उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात संविधान प्रास्ताविकेचे वाचन करून करण्यात आली. शाळेच्या वतीने मान्यवरांना संविधान उद्देशिका व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी डॉ. शुभा राऊळ यांनी विचार व्यक्त करताना संविधानाने प्रत्येक नागरिकाला समान हक्क दिला. विद्यार्थ्यांनी संविधानाने दिलेल्या हक्काची जाण ठेवून शिक्षण घ्यावे व स्वावलंबी बनावे असे मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांची शिस्त व शाळेचे कार्य पाहून फार आनंद झाल्याचे सांगितले. उमेश राऊळ यांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे सचिव नारायण समर्थ यांनी प्रास्ताविकेतून या कार्यक्रमाची भूमिका विशद केली व शाळेच्या कार्याची माहिती देऊन मान्यवरांना अवगत केले. विशेष शिक्षिका दीपिका बोरगावकर यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व सांकेतिक भाषेत समजावून सांगितले. क्रीडा शिक्षक संजय लुगे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाला विद्यार्थी शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.



अतिदुर्गम मुरकुडोह येथे प्रथमच मका व हरभरा पिकाची लागवड ; शेतकऱ्यांसमोर नवा आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न

दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

सालेकसा तालुक्यातील अतिदुर्गम मुरकुडोह परिसरात यंदा प्रथमच मका पिकाची लागवड करण्यात आली असून, यासोबतच हरभरा पिकाचीही लागवड करून शेतीत नवा प्रयोग करण्यात आला आहे. सामाजिक कार्यकर्ते तथा आदिवासी आघाडी भाजपा मंडळ सालेकसाचे अध्यक्ष मुकेश भाऊ इनवाते यांनी हा पुढाकार घेतला आहे. इनवाते यांनी एक एकर क्षेत्रात श्री पद्धतीने मका पिकाची लागवड केली असून, आणखी एक एकर क्षेत्रात हरभरा पिकाची लागवड केली आहे. विशेष म्हणजे, कमी पाण्यात येणाऱ्या रब्बी हंगामातील पिकांना प्राधान्य देत त्यांनी हा प्रयोग केला आहे.



शासनाकडून यंदा शेतकऱ्यांनी कमी पाण्याची गरज असणारी पिके घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्याच अनुषंगाने मुरकुडोह परिसरातील उपलब्ध नैसर्गिक जलस्रोतांचा योग्य वापर व्हावा, या उद्देशाने त्यांनी हा प्रयोग केला आहे. या भागातील नाल्यांमध्ये मार्च महिन्यापर्यंत पाणी उपलब्ध असते; मात्र या पाण्याचा शेतीसाठी फारसा उपयोग केला जात नाही. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा उपयोग करून रब्बी हंगामात शेती उत्पादन वाढविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

यावेळी श्री. मुकेश भाऊ इनवाते यांनी वन विभागाकडे विशेष विनंती केली आहे की, मुरकुडोह परिसरात वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात. जेणेकरून शेतकऱ्यांना आपल्या मेहनतीने घेतलेल्या पिकांचे नुकसान टाळता येईल आणि उत्पादनातून चांगले उत्पन्न मिळवता येईल.

माझा हा प्रयोग यशस्वी झाल्यास परिसरातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. नदी-नाल्यांमध्ये उपलब्ध असलेल्या पाण्याचा योग्य वापर करून कमी पाण्यात येणारी पिके घेतल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकते. यंदा मका आणि हरभरा पिकाचे उत्पादन चांगले झाल्यास पुढील वर्षापासून मुरकुडोह परिसरातील इतर शेतकरी बांधवदेखील कमी पाण्यात येणाऱ्या पिकांकडे वळतील, असा विश्वास श्री. इनवाते यांनी व्यक्त केला. अतिदुर्गम भागातील शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीसोबतच आधुनिक व कमी पाण्यात येणाऱ्या पिकांचे प्रयोग करावेत, उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करावा आणि शेतीतून आर्थिक प्रगती साधावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

सिर्सि ग्रामपंचायतीच्या कारभाराविरोधात पँथरचा संताप; संविधान दिन साजरा न केल्याने तीव्र निषेध

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर/सिर्सि- अखिल रोडे

२६ नोव्हेंबर २०२६ रोजी साजरा झालेल्या ७७ व्या संविधान दिनी सिर्सि ग्रामपंचायतीने संविधानाचा दिनाचा कार्यक्रम आयोजित केला नाही. तसेच सरपंच, सचिव आणि ग्रामपंचायत सदस्यांनीही या कार्यक्रमाकडे पाठ फिरवली, शासनाचे परिपत्रक असतांना ग्रामपंचायत सिर्सी ग्रामपंचायतने संविधान दिन साजरा केला नाही. ज्यामुळे संविधानाचा अवमान झाल्याचा आरोप करत भारतीय दलित पँथरच्या वतीने तीव्र निषेध नोंदवण्यात आला आहे.

या संदर्भात पँथरचे नागपूर जिल्हा कोषाध्यक्ष यशवंत अंबागडे यांनी सिर्सि ग्रामपंचायतीविरोधात निषेध व्यक्त करत प्रशासनाकडे कठोर कारवाईची मागणी केली आहे.

पँथर नेता यशवंत अंबागडे यांचे मनोगत

सिर्सि ग्रामपंचायतीच्या या भूमिकेवर बोलताना यशवंत अंबागडे यांनी प्रशासकीय अनास्थेवर आणि लोकप्रतिनिधींच्या उदासीनतेवर कडक शब्दांत ताशेरे ओढले आहेत.

संविधानाचा अवमान आणि प्रशासकीय निष्क्रियता:

"भारतीय संविधान हा देशाचा सर्वोच्च आधार आहे. मात्र, ग्रामपंचायत स्तरावर लोकप्रतिनिधी आणि प्रशासनच संविधान दिनाकडे दुर्लक्ष करत असतील, तर ही अत्यंत गंभीर बाब आहे. ग्रामपंचायतीचा कारभार संविधानाच्या चौकटीत चालत नसल्याचे यातून स्पष्ट होते," असे अंबागडे यांनी नमूद केले.

योजनांचा लाभ आणि संवैधानिक मूल्ये:

"केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजना राबवताना, संविधान दिवस हा केवळ औपचारिकता नसून तो आपल्या हक्क आणि कर्तव्यांचा दिवस आहे; त्यामुळे तो शासकीय थाटात आणि सन्मानाने साजरा होणे आवश्यक आहे."

प्रतिमा लावण्याची आणि अभिवादनाची मागणी

"ग्रामपंचायतीचे लोकप्रतिनिधी संवैधानिक निकषांनुसार निवडून आलेले असले, तरी सरपंच, सचिव आणि सर्व सदस्यांनी संविधान दिनाच्या दिवशी प्रतिमेचे पूजन व अभिवादन ग्रामपंचायतीत करणे बंधनकारक आहे."

या निषेध मोहिमेद्वारे भारतीय दलित पँथरच्या वतीने पुढील मागण्या पुढे करण्यात आल्या आहेत.सिर्सि ग्रामपंचायतीच्या या प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदारांवर तात्काळ कारवाई करावी. मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद, नागपूर) तसेच प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन (मुंबई) यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेऊन ग्रामपंचायतींना संवैधानिक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे स्पष्ट आदेश द्यावेत.

भारतीय संविधान ग्रंथांचे वाटप; सालेकसा येथे उत्साहात संविधान दिन साजरा

दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

भारतीय संविधान दिनानिमित्त सालेकसा येथे रक्तदान शिबिर, संविधान ग्रंथांचे वाटप आणि जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करून संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

दि. २६ नोव्हेंबर २०२६ रोजी सालेकसा पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक रवी नागेसे यांच्या पुढाकाराने २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीर अधिकारी व जवानांच्या स्मृतिप्रीत्यर्थ तसेच संविधान दिनाचे औचित्य साधून लोककल्याणासाठी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात सालेकसा येथील कवयित्री व सामाजिक कार्यकर्त्या डॉ. किरणताई मोरे-चव्हाण यांनी स्वतः रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. तसेच त्यांनी पोलीस स्टेशनमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांना भारतीय संविधान ग्रंथ भेट देऊन संविधानाचे महत्त्व अधोरेखित केले.



यावेळी एपीआय किशोर मावस्कर, एएसआय डोंगरे, एचसी विशाल जनबंधू, पीसी बडोले, डब्ल्यूएचसी जयश्री चवरे आदी पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

त्यानंतर अपना घर वृद्धाश्रम येथे वृद्धाश्रमाचे संचालक महेंद्र (लकी) रंगारी यांच्या सहकार्याने संविधान दिनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी संविधानाचा जयघोष करण्यात आला. कवी विजय वडवेराव लिखित संविधान गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अशोक रंगारी होते, तर उद्घाटक म्हणून जितेश माहुले उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून कैलास गजभिये, महेंद्र रंगारी, डॉ. किरणताई मोरे-चव्हाण, एन. पी. मोरे, सरोज परतेकी, लकी मोरे व रसिका मोरे उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी भारतीय संविधानाचे महत्त्व विशद केले. स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता ही मूल्ये भारतीय समाजात सदैव नांदावीत, हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा व्यापक दृष्टिकोन संविधानात प्रतिबिंबित झाला आहे. प्रत्येक नागरिकाला मूलभूत हक्क, समान नागरी अधिकार, दर्जेदार शिक्षण, महिला व ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान तसेच सर्व सजीव सृष्टीच्या अस्तित्वाचा आदर मिळावा, हा संविधानाच्या मूल्यांचा संदेश असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

संविधानातील विचार व मूल्यांचा समाजात प्रचार आणि प्रसार व्हावा, नागरिकांना आपल्या हक्कांसोबतच कर्तव्यांचीही जाणीव व्हावी, या उद्देशाने यावेळी भारतीय संविधान ग्रंथांचे वाटप करण्यात आले. संविधानाविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचेही मत व्यक्त करण्यात आले. विशेष म्हणजे, संविधान सभेने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधान स्वीकारले होते. त्यामुळे हा दिवस देशभर संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. या ऐतिहासिक दिवसाचे महत्त्व अधोरेखित करणारा हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरला.

कार्यक्रमाचे मार्गदर्शक म्हणून फुलेप्रेमी, संविधानदूत, शिक्षक, कवी व सामाजिक कार्यकर्ते विजय वडवेराव यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे कार्यक्रमाला वैचारिक दिशा मिळाली. कार्यक्रमासाठी अपना घर वृद्धाश्रमातील सर्व आजी-आजोबांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे संचालन महेंद्र रंगारी यांनी केले, तर आभार प्रदर्शन अंबिका रंगारी यांनी मानले.

थोडक्यात

प्रागतिक विद्यालयाच्या आंतरशालेय नृत्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक



दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी

डुँगन पॅलेस च्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त २४ ते २६ नोव्हेंबर ला आंतर शालेय नृत्य स्पर्धेचे आयोजन मोठ्या उत्साहात व आनंदात डुँगन पॅलेस टेम्पल कामठी येथे करण्यात आले होते, या नृत्य स्पर्धेत प्रागतिक माध्यमिक विद्यालय कोराडीच्या मुलींच्या चमूने ३ हजार रुपये रोख द्वितीय पारितोषिक मिळविले. वावेळी विद्यार्थांनी डुँगन पैलेस च्या संस्थापक व माजी राज्यमंत्री एड. सुलेखा ताई कुंभारे यांची विद्यार्थांनी भेट घेतली. या नृत्याचे मार्गदर्शन शाळेच्या मुख्याध्यापिका विद्या संजय समरीत यांनी व नृत्याचे दिग्दर्शन प्रेमलता धनजोडे, योगिता मनापुरे, व सौ. लता गाडगे यांनी केले

याप्रसंगी प्रागतिक अध्यापक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष वसंतराव गाडगे, सचिव प्रकाशजी कुंभलकर,पर्यवेक्षक प्रल्हाद दुधपाचे, शिक्षक प्रणय खरबडे,संजय समरीत, किशोर नंदनवार, संघकुमार शंभरकर,नरेंद्र टाकळखेडे, सौरभ फरांडे, बलवंत बरबटकर, अर्जिक्य महाजन,आशिष नासरे, अमोल भुडे शिक्षिका अरुणा वारकर, मीनाक्षी गाडगे, वैशाली वाघ, सुरेखा थाटे, रुपाली भोंडेकर व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

श्रीवास नगरमध्ये कार्तिक पौर्णिमा उत्सव उत्साहात साजरा



दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी

हनुमान मंदिर पंच कमेटी, श्रीवास नगर महादुला द्वारे हनुमान मंदिर या ठिकाणी कार्तिक पौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. ३६ वर्षांपासून अविरत धार्मिक परंपरा जपत जागृती व त्रिपूर पौर्णिमा कार्यक्रम, पालखी, दहिकाला कार्यक्रम आणि भव्य महाप्रसाद चे आयोजन करण्यात आले यावेळी ३५०० पेक्षा जास्त भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या प्रसंगी मुख्य अभियंता विराज चौधरी, मुख्य अभियंत मनीष बेडेकर, माजी नगराध्यक्षा राजेश रंगारी, मनोज सावजी, प्रविण मडावी, प्रविण बुटे, नगरसेवक अजय सोलंकी, गोपाल नैकाने, नगरसेविका नंदाताई तूरक, आम्रपालीताई सोनारे, प्रतिभाताई गजभिये, पूजाताई मेश्राम, रामूजी गोमासे, रामबाबू तोडवाल, प्रितम लोहासारवा, नाना लांडे, राहुल बागडे, सिद्धार्थ शेंडे, किरणताई कटरे, गुणवंता पटले, दिनेश तोडवाल, महेंद्र भातकुलकर, प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेकरिता जयपाल बिरखेडे, राजेश मछले, अमरजीत गोडबोले, शंकर शेंडे, मुन्ना मेश्राम, घनश्याम मेश्राम, विनोद आगासे, राहुल मानकर, ब्रिजलाल खोब्रागडे, सुनील खोब्रागडे, पुरण आगासे, ताराचंद पारधी, वनिता मेश्राम, महावीर चन्नोरे, जितेश भगत,माधव लाडे, लता खोब्रागडे, काशीराम आगासे, दिलीप मेश्राम, सुरेश मोटघरे, राहुल मानकर, योगेश मेश्राम,अजय मानकर, रवींद्र मेश्राम, सुरेंद्र मेश्राम, प्रियांशु मोटघरे, अजय हुडे, हर्षल कुरंजेकर, संजय राऊत, राजेश बोरकर, मनोज शेंडे, मैत्रेय मिलिंद गाडेकर,नितून आगासे, प्रफुल्ल नारनवरे,रामू लांडगे, दिपक सूर्यवंशी आदींनी परिश्रम घेतले.

चाचेर येथे शेतातून सबमर्सिबल मोटारपंप चोरी

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू:मौदा

रामटेक पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या मौदा तालुक्यातील चाचेर येथील रहिवासी पुरुषोत्तम नामदेव गडे(५५) यांच्या शेताच्या विहिरमध्ये पाण्याच्या आत असणारी दोन वर्षांपूर्वी विकत घेतलेली अंदाजे १५००० (अक्षरी पंधरा हजार रुपये)किमतीची लक्ष्मी गोल्ड कंपनीची ३ एचपी ची सबमर्सिबल मोटरपंप गुरुवार (ता. २६ नोव्हेंबर)सायंकाळी ६:३० वाजता ते शुक्रवार (ता. २७ नोव्हेंबर) सकाळी ६:३० वाजता दरम्यान अज्ञात इसमाने चोरून नेली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, चाचेर येथील पुरुषोत्तम गडे यांची १ एकर २५ डिस्मिल(सव्वा एकर) शेती चाचेर शिवारात असून ,त्या शेतीत मिरचीची लागवड केलेली आहे. गडे हे गुरुवार (ता.२६ नोव्हेंबर)ला दिवसभर मिरची पिकाला मोटार पंपाने पाणी देऊन सायंकाळी ६:३० वाजता घरी आले. पुन्हा शुक्रवार (ता.२७ नोव्हेंबर)ला सकाळी ६:३० वाजता शेतात मिरचीला पाणी देण्यासाठी विहिरीजवळ मोटार पंप सुरू करण्यासाठी गेले असता, मोटारीच्या वायर व पाईप कापून अज्ञात इसमाने विहिरीत पाण्याच्या आत असणारी लक्ष्मी गोल्ड कंपनीची ३ एचपीची सबमर्सिबल मोटर चोरून नेल्याचे त्यांना आढळले. त्यांनी याबाबत आज शनिवार (ता. २८ नोव्हेंबर)ला रामटेक पोलीस स्टेशनला जाऊन तोंडी रिपोर्ट दिली. रामटेक पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत अज्ञात इसमाविरुद्ध ३०३(२) अंतर्गत अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करून तपासाला सुरुवात केली आहे.

जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी २४ डिसेंबरपर्यंत अर्ज करा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

जिल्ह्यातील गुणवंत खेळाडू (पुरुष, महिला व दिव्यांग) तसेच क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या क्रीडा मार्गदर्शकांना सन २०२५-२६ चा जिल्हा क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने पात्र उमेदवारांकडून २४ डिसेंबरपर्यंत प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. या पुरस्काराचे स्वरूप प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह आणि १० हजार रुपये असे आहे. खेळाडू पुरस्कारांतर्गत पुरुष, महिला व दिव्यांग अशा तीन गटांत, तर गुणवंत क्रीडा मार्गदर्शकासाठी स्वतंत्र पुरस्कार देण्यात येणार आहे.

जलजीवन मिशनच्या ६६ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित होण्याचा मार्ग मोकळा

महसूल मंत्र्यांच्या बैठकीत महत्वपूर्ण निर्णय; पाणी, चारा टंचाई व जलसंधारण कामांचा आढावा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

संभाव्य पाणी टंचाईवर मात करण्यासाठी जलजीवन मिशनच्या अंतिम टप्यात असलेल्या योजना उपयुक्त ठरु शकतात. त्यामुळे ७५ टक्केपेक्षा अधिक काम झालेल्या आणि वीज कनेक्शनमुळे सुरु होऊ शकणाऱ्या योजनांना वीज कनेक्शनसाठी आवश्यक पायाभूत सुविधा व सुरक्षा टेवसह तत्काळ प्रशासकीय मान्यता व निधी देण्याचे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. त्यामुळे या योजना लगेच कार्यान्वित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

महसूलमंत्र्यांनी नियोजन भवन येथे पाणी व चारा टंचाई, जलसंधारण विभागाची टंचाई कामे व विविध विषयांचा आढावा घेतला. आमदार डॉ.राजीव पोतदार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

जिल्ह्यात पाणी टंचाई निवारणाचे पहिल्या टप्याचे नियोजन झाले असून दुसऱ्या टप्यातील आराखडा तयार करण्यात येत आहे. सदर आराखडा तातडीने तयार करून त्यास मंजूरी देण्यात यावी. पाणी टंचाईच्या अनुषंगाने जोखमीच्या असलेल्या गावांना उपाययोजनांचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश तत्काळ देऊन कामे लवकरात लवकर सुरु करावीत, असे निर्देश बावनकुळे यांनी दिले.

जिल्हा परिषदेच्यावतीने ग्रामीण भागात पाणी टंचाई निवारणाचे नियोजन केले जाते. आतापर्यंत या भागातील ३४७ उपाययोजना कामांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. उर्वरीत आराखडे तयार करण्यात यावे. ज्या ठिकाणी कामे तातडीने करणे



आवश्यक आहे आणि ग्रामपंचायती कामे करण्यास अनुत्सुक आहेत, अशा कामांसाठी कंत्राटदारांचे पॅनेल व दर निश्चित करून कामे करण्याचा सूचना केल्या.

नगरपरिषद क्षेत्रात टंचाई कामांचे नियोजन करतांना विहिर दुरुस्ती, पुनर्भरणासारखी कामे घेण्यात यावी. त्यासाठी अंदाजपत्रके, भुजल सर्वेक्षण विभागाचे प्रमाणपत्र, तांत्रिक मान्यता आणि कमी कालावधीच्या निविदा प्रक्रिया राबविण्यात याव्या. शहरी भागात १० डिसेंबरपासून टंचाई निवारणाची कामे सुरु होतील, याद्दष्टीने नियोजन करावे तसेच या कामांचा प्रत्येक आठवड्यात आढावा घेण्याचा सुचना त्यांनी केल्या.

एलनिनोचा प्रभाव दिर्घकाळ राहणार असल्याची शक्यता असल्याने लघु पाटबंधारे, कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यांचे पुनर्भरण, दुरुस्तीवर भर देण्याची सुचना महसूलमंत्र्यांनी केली. वासाठी जिल्ह्यातील अशा सर्व तलाव, बंधाऱ्यांचे सखोल सर्वेक्षण तसेच आवश्यक तेथे दुरुस्तीची कामे घेण्यात यावी. सद्यस्थितीत आवश्यक १११ बंधाऱ्यांच्या दुरुस्ती कामांना मान्यता देण्याचे निर्देश दिले.

गाळपेर क्षेत्रात चारा लागवड

चारा टंचाईचा आढावा घेतांना जिल्ह्यात कुठेही जनावरांना टंचाई जाणवणार नाही, यादी दक्षता घ्यावी. सद्या जिल्ह्यात २३३ दिवस पुरेल इतका चारा उपलब्ध असला तरी भविष्यातील परिस्थिती वाईट राहण्याची शक्यता असल्याने जास्तीत जास्त गाळपेर क्षेत्र चारा पिकाखाली आणण्याची सुचना केली.

५ डिसेंबरपर्यंत १०० टक्के फार्मर आयडी, पिक पाहणी

प्रत्येक शासकीय योजनेसाठी फार्मर आयडी आवश्यक आहे. त्यामुळे फार्मर आयडीसह पिक पाहणीचे काम येत्या ५ डिसेंबरपर्यंत शंभर टक्के पूर्ण करण्याचे निर्देश सर्व उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले. वासाठी सर्व तलाठी, कृषी सहाय्यकांना कामी लावा आणि या कामाचे रोजच्या रोज नियंत्रण करा, असे निर्देश दिले.

तर ले-आऊटधारकांवर गुन्हे दाखल करा

गेल्या काही वर्षात जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागात असंख्य लेआऊट झाले आहे. अनेक लेआऊट मालकांनी नागरी सुविधा न दिल्याने नागरिकांची फसवणूक झाली. त्यामुळे सर्व प्राधिकरणाच्या क्षेत्रात मंजूर किंवा अनधिकृत असलेल्या व नव्याने मान्यता दिलेल्या व जुन्या अशा सर्व लेआऊटची नागरी सुविधा पाहणी करावी. या पाहणीत फसवणुकीचे प्रकार उघडकीस आल्यास गुन्हा दाखल करण्याच्या सुचना केल्या.

त्या रहिवाशांना सातबारे देण्यासाठी विशेष मोहिम

ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपंचायत, महानगरपालिका क्षेत्रात अनेक लेआऊटमध्ये नागरिकांना सातबारे उपलब्ध झाले नाहीत. त्यात काही अधिकृत तर काही अनधिकृत लेआऊटचा समावेश आहे. अशा रहिवाशांना सातबारे उपलब्ध करून देण्यासाठी विहित पद्धत निश्चित करण्याचे निर्देश बैठकीतूनच जमाबंदी आयुक्तांना दिले.

ग्राम विकास विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मेटपांजरा येथे भारतीय संविधान दिन उत्साहात

दै. सिंहवाणी वृत्त, काटोल

ग्राम विकास विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मेटपांजरा येथे २६ नोव्हेंबर २०२६ रोजी भारतीय संविधान दिन विविध शैक्षणिक व प्रबोधनात्मक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी दि जनसेवक शिक्षण संस्था, रिधोरा येथील सचिव मा. जयंत टालाटुले यांनी भारतीय संविधान या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. आपल्याव्याख्यानातून त्यांनी भारतीय संविधान निर्मितीची पार्श्वभूमी, संविधान सभेचे कार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्मितीतील योगदान तसेच संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार आणि नागरिकांची कर्तव्ये यांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाचे स्थान महत्त्वाचे असून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांच्या आधारावर आदर्श समाजनिर्मिती शक्य आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या प्राचार्या डॉ. वैशाली



टालाटुले होत्या. आपल्या मनोगतात त्यांनी भारतीय संविधानाचे महत्त्व विशद करताना संविधान हे प्रत्येक भारतीय नागरिकाला न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांची हमी देणारे महत्त्वपूर्ण दस्तऐवज असल्याचे सांगितले. संविधानामुळे प्रत्येक नागरिकाला समान अधिकार प्राप्त झाले असून त्याचबरोबर प्रत्येकाने आपल्या कर्तव्यांची जाणीव ठेवून जबाबदार नागरिक म्हणून वागणे आवश्यक आहे, असे त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले. संविधानाचा आदर करणे आणि त्यातील मूल्ये दैनंदिन जीवनात आचरणात आणणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमात सर्वांनी सामूहिकरीत्या भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन केले. विद्यार्थिनींनी संविधानावर आधारित प्रेरणादायी गीतांचे गायन करून कार्यक्रमात विशेष रंगत आणली.

कार्यक्रमाचे समन्वयक लखोटे सर यांनी विद्यार्थ्यांसाठी भारतीय संविधानावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन केले. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांचे स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय असे चार गट तयार करण्यात आले. विविध फेऱ्यांमध्ये संविधानाची निर्मिती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान, मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्ये, लोकशाही आणि संविधानातील महत्त्वाच्या तरतुदींवर प्रश्न विचारण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या ज्ञानाचे प्रदर्शन केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना संविधानाविषयी अधिक सखोल माहिती मिळाली.

यानंतर शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी मानवी साखळी तयार करून राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक समता आणि बंधुभावाचा संदेश दिला. तसेच गावातून प्रभात फेरी व संविधान रॅली काढण्यात आली. विविध घोषवाक्यांच्या माध्यमातून ग्रामस्थांमध्ये संविधानाविषयी जनजागृती करण्यात आली.

या कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक अजय केचे, नरेंद्र राऊत, प्रशांत मोरे, प्रवीण किनारकर, गणेश जिचकार, विनोद तरटे, विजय देवते, मंजुषा मदनकर, जयश्री अंभोरे लिलाधर वाहने, अनिल अखंड, निळकंठ कुकडे कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. संविधानाविषयी जागरूकता निर्माण करणे, लोकशाही मूल्यांची जोपासना करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये जबाबदार नागरिकत्वाची भावना विकसित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्या डॉ. वैशाली टालाटुले यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

अनंता आनंदराव मुदगले यांना पीएचडी (आचार्य) पदवी प्रदान

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या Interdisciplinary studies (समाजकार्य- Social Work) विद्याशाखेअंतर्गत अनंता आनंदराव मुदगले यांना पीएचडी (आचार्य) पदवी प्रदान करण्यात आली आहे. अनंता मुदगले यांनी इम्पॅक्ट ऑफ वुमेन कम्युनिटी बेस्ड ऑर्गनायझेशन ऑन लाइव्हलीहूड अँड एम्पॉवरमेंट इन अर्बन एरिया अंडर गव्हर्नमेंट प्रोग्रॅम (शासकीय योजनाअंतर्गत शहरी भागातील महिला समुदाय-आधारित संस्थांचा उपजीविका व सक्षमीकरणावरील परिणाम) या विषयावर आपला शोधप्रबंध सादर केला होता.



या संशोधनासाठी त्यांना पुरुषोत्तम थोटे कॉलेज ऑफ सोशल वर्क, नागपूर येथील गाईड म्हणून सहयोगी प्राध्यापक डॉ. अशोक सलामे व प्राचार्य- डॉ.पुरुषोत्तम थोटे(नागपूर) यांचे मार्गदर्शन लाभले.

डॉ. अनंता मुदगले हे बी.ए. (B.A.), एम.एस.डब्ल्यू. (M.S.W.) व एम.ए. अर्थशास्त्र (M.A. Economics) असे उच्चशिक्षित असून, त्यांनी शासनाच्या विविध विभाग व प्रकल्पांमध्ये राज्यस्तरावर राज्य कार्यक्रम व्यवस्थापक (ग्राम विकास विभाग, सहकार विभाग), राज्य समन्वयक, सल्लागार आणि तज्ज्ञ म्हणून उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय मार्गदर्शक, मित्र डॉ.प्रशांत सूर्यवंशी (माहुर), प्रसाद राजेभोसले, स्टेट मिशन मॅनेजर-एनयूएलएम,मुंबई, कुटुंबीय तसेच मित्रपरिवाराला दिले आहे.

बालविवाहमुक्त समाजासाठी जनजागृतीचा निर्धार; महिला व बाल विकास विभागामार्फत नागपुरात विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने ठराव मंजूर करून दरवर्षी २७ नोव्हेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय बाल, लवकर व सक्तीच्या विवाह निर्मूलन दिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली आहे. हा ठराव सर्व सदस्य राष्ट्रांच्या सहमतीने मंजूर करण्यात आला. त्यानुसार यावर्षी प्रथमच २७ नोव्हेंबर रोजी हा आंतरराष्ट्रीय दिवस साजरा करण्यात येत आहे. या दिनाचे औचित्य साधून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयांतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्ष, नागपूर, महिला आर्थिक विकास महामंडळ, न्यू व्हिजन फाउंडेशन आणि ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दिनांक २७ नोव्हेंबर २०२६ रोजी गोरा कुंभार सांस्कृतिक भवन, वाठोडा रोड, नागपूर येथे विशेष



जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुनील मेसरे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण, जिल्हा बाल संरक्षण समन्वयक, शिक्षण विभाग प्रसेनजित गायकवाड, न्यू व्हिजन फाउंडेशनच्या श्रीमती प्रियंका होटे,ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्टच्या शाहीना शेख, विदर्भ रिजन मूल्यमापन व सनियंत्रण अधिकारी राजू इंगळे, सहनियंत्रण अधिकारी मोहन घनवटे तसेच सीएमआरसी व्यवस्थापक श्रीमती सोनाली शेंडे यांच्यासह चाइल्ड हेल्पलाईन १०९८ व सखी वन स्टॉप सेंटरचे प्रतिनिधी उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान बालविवाह प्रतिबंधक कायदा, बालविवाहाचे सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक दुष्परिणाम, बालकांचे अधिकार तसेच बालविवाह रोखण्यासाठी विविध यंत्रणांची भूमिका याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. बालविवाहामुळे बालकांच्या शिक्षणावर, आरोग्यावर आणि सर्वांगीण विकासावर होणाऱ्या प्रतिकूल परिणामांची माहिती देण्यात आली. बालविवाह ही केवळ सामाजिक समस्या नसून बालकांच्या मूलभूत हक्कांवर परिणाम करणारी बाब असल्याने समाजातील प्रत्येक घटकाने बालविवाह प्रतिबंधासाठी सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे चाइल्ड हेल्पलाईन १०९८ मार्फत सादर करण्यात आलेले बालविवाहविरोधी जनजागृतीपर पथनाट्य. तसेच महिला सक्षमीकरण, मुलींचे शिक्षण, बालकांचे संरक्षण आणि त्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्याच्या महत्त्वावरही विशेष भर देण्यात आला. बालविवाह रोखण्यासाठी पोलीस विभाग, महिला व बाल विकास विभाग, शिक्षण विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच स्वयंसेवी संस्थांनी परस्पर समन्वयाने कार्य करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. बालविवाह प्रतिबंधासाठी जनजागृतीसोबतच वेळेवर माहिती देणे आणि संबंधित यंत्रणांनी तातडीने कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवर, अधिकारी व सहभागी प्रतिनिधींनी बालविवाह प्रतिबंधाची सामूहिक शपथ घेतली. बालविवाहास प्रोत्साहन न देणे, बालविवाहाची कोणतीही घटना निदर्शनास आल्यास तातडीने संबंधित यंत्रणांना माहिती देणे, बालकांच्या सुरक्षिततेसाठी पुढाकार घेणे आणि बालविवाहमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी सक्रिय योगदान देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या जनजागृती कार्यक्रमाच्या माध्यमातून बालविवाह निर्मूलन, महिला सक्षमीकरण, मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन आणि बालकांच्या हक्कांचे संरक्षण याबाबत समाजात जागरूकता निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. बालविवाहमुक्त समाजाची निर्मिती करण्यासाठी शासनाच्या यंत्रणांसोबतच पालक, नागरिक, सामाजिक संस्था आणि सर्व घटकांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले.